बुधवार, ०४ जानेवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१३७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • WEDNESDAY 04 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-137 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

## आंबा बहरला



उस्मानाबाद जिल्ह्यात यावर्षी फळांचा राजा आंबा चांगलाच बहरला आहे. मात्र काही दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे कीटकांचा व बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आंब्याचा मोहर गळू नये म्हणून कीटकनाशक व बुरशी नाशकाची फवारणी मारून आंब्याचे नुकसान टाळावे. छायाचित्र : सचिन कोरडे

# सरकार झोपले होते का ?

## जॉन्सन बेबी पावडर प्रकरण : न्यायालयाने फटकारले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : जॉन्सन अ‍ॅण्ड जॉन्सन या कंपनीचे बेबी टाल्कम पावडर उत्पादन लहान मुलांच्या आरोग्यासाठी हानिकारक होते, तर नोव्हेंबर २०१९ पासून या उत्पादनाचा परवाना रद्द करण्याच्या कारवाईबाबत झोपला होता का ? हीच तुमची लहान मुलांच्या आरोग्याप्रतीची तत्परता आहे का ? अशी प्रश्नांची सरबत्ती उच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य सरकारला केली. तसेच कारवाईतील विलंबाबाबत सरकारला धारेवर धरले.**

एवढेच नव्हे तर, ज्या नियमांच्या आधारे बेबी पावडरच्या नमुन्यांची चाचणी घेण्यात आली आणि चाचणी अहवालाच्या आधारे उत्पादनाचा परवाना रद्द करण्यात आला, ते नियम केंद्र सरकारने २०२१ मध्ये रद्दबातल केले. ही बाब लक्षात घेता उत्पादनावर केलेली कारवाई कायद्याच्या कसोटीवर उतरत नाही. याच मुद्यावर परवाना रद्द करण्याचा आदेश रद्दबातल केला जाऊ शकतो, असेही न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती संतोष दिगे यांच्या खंडपीठाने म्हटले. करोनामुळे कारवाईला विलंब झाल्याचे अतिरिक्त सरकारी वकील मिलिंद मोरे यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र या उतारावरूनही न्यायालयाने सरकारला धारेवर धरले. कंपनीचे बेबी टाल्कम पावडर उत्पादन लहान मुलांच्या आरोग्यासाठी हानिकारक होते, तर उत्पादनावर ४८ तासांत कारवाई का केली नाही ? कोरोनाने जगातील सगळे व्यवहार थांबले होते का ? नोव्हेंबर २०१९ ते सप्टेंबरपर्यंत २०२२ पर्यंत कार्यरत नव्हते का ? उत्पादन लहान मुलांच्या आरोग्यास हानिकारक असल्याचे मानले तर दोन वर्षे कारवाई न करणे ही सरकारची तत्परता आहे का ? असेही न्यायालयाने सरकारला सुनावले. तसेच सरकार नव्या नियमांनुसार पावडरच्या नमुन्यांची नव्याने चाचणी करणार असेल तर त्यांना तशी मुभा आहे. परंतु उत्पादनाचा परवाना रद्द करण्याचा आदेश कायम राहू शकत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. सरकारी वकिलांनी त्यानंतर याबाबत भूमिका स्पष्ट करण्यासाठी वेळ मागितला. कंपनीचे बेबी टाल्कम पावडर हे उत्पादन आरोग्यास हानिकारक



असल्याचा आरोपानंतर आणि त्याच्या नमुन्यांच्या चाचणीनंतर उत्पादनाचा परवाना अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) रद्द केला होता. तसेच प्रसाधनाचे उत्पादन व विक्री तातडीने थांबवण्याचे आदेश कंपनीला दिले होते. मात्र परवाना रद्द करण्याचा निर्णय तीन महिन्यांनी म्हणजेच १५ डिसेंबरनंतर लागू होईल, असेही एफडीएने स्पष्ट केले होते. या निर्णयाविरोधात कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तसेच याचिका निकाली निघेपर्यंत निर्णयाला स्थगिती देण्याची आणि मुलुंड येथील प्रकल्पामध्ये बेबी पावडरचे उत्पादन व विक्रीस मुभा देण्याची मागणी केली होती. त्यातील केवळ उत्पादन निर्मितीची मागणी न्यायालयाने मान्य केली होती. याशिवाय परवाना १५ डिसेंबर रोजी संपलेला असतानाही या बालप्रसाधनाचे उत्पादन सुरू ठेवण्यास परवानगी देऊन कंपनीला अंतरिम दिलासा दिला होता.

# नोटबंदी करताना केंद्राने विश्वासात घेतले नाही : आरबीआय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने सोमवारी नोटबंदीबाबत मोठा निर्णय दिला आहे. केंद्र सरकारने सहा वर्षांपूर्वी ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा चलनातून रद्द करण्याचा घेतलेला निर्णय ४:१ च्या बहुमताने कायम ठेवला. पण नोटबंदीच्या निर्णय प्रक्रियेत आरबीआयला विश्वासात घेतले नसल्याची माहिती आरबीआयकडून देण्यात आली आहे. नोटबंदीचा निर्णय घेण्याआधी सहा महिने केंद्र सरकार आरबीआयशी सल्लामसलत करत होते, असे सांगण्यात आले. पण आरबीआय मंडळाला निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्यात आले नाही. कदाचित आरबीआयचे एक-दोन अधिकारी निर्णय प्रक्रियेचा भाग असतील. पण नोटबंदीचा निर्णय घेण्यापूर्वी अर्धा ते एक तास आधी एक बैठक बोलवण्यात आली. तसेच या बैठकीच्या विषयाची माहितीही आरबीआय अधिकाऱ्यांना देण्यात आली नव्हती, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. नोटबंदीच्या निर्णय प्रक्रियेत आरबीआय बोर्डाला विश्वासात घेतले नव्हते, असे संकेत एका अधिकाऱ्याने दिले. आरबीआय बोर्डाने मे २०१६ मध्ये म्हणजेच नोटबंदीच्या सहा महिने आधी दोन हजार रुपयांच्या नवीन नोटा चलनात आणण्यास मंजुरी दिली होती. परंतु २०१६ मध्ये जुलै आणि ऑगस्ट महिन्यात आरबीआय बोर्डच्या बैठकांमध्ये ५०० आणि एक हजार रुपयांच्या नोटा मागे घेण्याबाबत कोणतीही चर्चा केली नाही, असेही आरबीआयकडून सांगण्यात आले. यापूर्वी 'इंडियन एक्स्प्रेस'ला माहितीच्या अधिकाराअंतर्गत (आरटीआय) मिळालेल्या माहितीनुसार, १९ मे २०१६ रोजी केंद्रीय बोर्डाने दोन हजार रुपयांच्या नोटा चलनात आणण्याच्या प्रस्तावावर चर्चा केली आणि त्याला मंजुरी दिली. तथापि, ५०० आणि एक हजार रुपयांच्या नोटांवर बंदी आणण्याबाबत कोणतीही चर्चा झाली नाही.

# 'त्या' प्रश्नावर परराष्ट्रमंत्री संतापले



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान अशा दोन राष्ट्रांची निर्मिती झाल्यापासून द्विपक्षीय संबंध तणावपूर्ण राहिले आहेत. यामध्ये पाकिस्तानकडून दहशतवादाला दिला जाणारा छुपा वा उघड पाठिंबा हे सर्वात महत्त्वाचे कारण ठरले आहे. भारतानंही यासंदर्भात सातत्याने वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर आक्रमक भूमिका मांडली आहे. देशाचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी नुकतीच संयुक्त राष्ट्राच्या संरक्षणविषयक सभेमध्येही पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादावर परखड भाष्य केले होते. त्याचे पडसाद भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावरही पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर ऑस्ट्रियामधील एका वृत्तवाहिनीच्या अँकरने एका टॉक शोमध्ये पाकिस्तानबाबत विचारलेल्या एका प्रश्नामुळे एस. जयशंकर संतापले. त्यांनी त्यावरून न्यूज अँकरलाच विशिष्ट पद्धतीने सुनावले. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ऑस्ट्रियातील ORF या न्यूज चॅनलवर भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची मुलाखत घेतली जात होती. समोरील अँकरने जयशंकर यांच्या एका विधानाबाबत त्यांना प्रश्न विचारला.जयशंकर यांनी पाकिस्तानचा उल्लेख 'दहशतवादाचा केंद्रबिंदू' असा केल्याबाबत त्यांना विचारणा करण्यात आली. त्यावर जयशंकर यांनी उलट संबंधित न्यूज अँकरलाच सुनावले आहे.




मराठवाड्यातील सर्वसामान्यांचा बुलंद आवाज


महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई

पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

पत्रकारांनी आपल्या महत्वाच्या फक्त पाच बातम्या, लेख, वृत्तलेख, अग्रलेख
prabhugore@gmail.com
या ईमेलवर पाठवावे.

अधिक माहितीसाठी
9075719739, 9822629833



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## आँखोंसे जो उतरी हैं दिलमें ...



गायिले तेव्हा सर्वांची काय अवस्था झाली ते आपण रामायणात वाचतोच. ज्यांना आपण आधुनिक वाल्मिकी म्हणतो ते ग दि माडगूळकर गीतरामायणाच्या लेखनामुळे अजरामर झाले. हेच गीतरामायण बाबूजी उर्फ सुधीर फडके यांनी गाऊन अजरामर केले. यातील ते गीत सहजच ओठांवर येते स्वये श्रीरामप्रभू ऐकती, कुश लव रामायण गाती. मग ही गाणारी मुले कशी आहेत याचे चित्रमय वर्णन गदिमा करतात. ते म्हणतात
राजस मुद्रा वेष मुनींचे, गंधर्वच ते तपोवनींचे
अशा एकेक ओळी आठवत जातात. या सगळ्यांचा श्रोतृवृंदावर काय परिणाम होतो, तो पण गदिमा जणू सचित्र आपल्या डोळ्यांसमोर उभा करतात. ते म्हणतात सामवेदसे बाळ बोलती, सर्गामागुनी सर्ग चालती सचिव मुनिजन प्रिया डोलती, आसवे गाली ओघळती. प्रत्यक्ष श्रीरामांवर काय परिणाम झाला तर... सोडून आसन उठले राघव, उठुनि कवळती अपुले शैशव पुत्रभेटीचा घडे महोत्सव, परी जो उभया नच माहिती. अशी जादू जणू हे शब्द करतात ! मग ते शब्द वाल्मिकींचे असोत वा गदिमांचे. ती अमूर्त अक्षरे ध्वनीचे रूप घेऊन कानावाटे हृदयापर्यंत पोहोचतात. आनंदाच्या चांदण्याची बरसात होते. कर्तव्यकठोर असलेल्या श्रीरामांचे देखील डोळे पाणावतात. माया, ममता, प्रेम, करुणा सगळे सगळे भाव हे शब्द उभे करतात. असं म्हटलं जातं की प्रख्यात जर्मन कवी गटे यांनी कालिदासाच्या शाकुंतल या नाटकाचं जर्मन भाषेत केलेलं भाषांतर जेव्हा वाचलं, तेव्हा त्यांना इतका आनंद झाला की हा जर्मन कवी आपलं देहभान विसरून शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचला. कुठून आला हा आनंद ? पुस्तकाच्या वाचनातूनच ना ? या आनंदाला उपमा नाही आणि त्याची तुलना इतर कुठल्या आनंदाशी होऊ शकत नाही. त्या काळात पाश्चात्य साहित्यात सौंदर्यवाद मूळ धरू लागला होता. अशा काळात कालिदासाने लिहिलेलं शकुंतलेचं आणि निसर्गाचं वर्णन वाचून हा कवी अक्षरशः वेडा झाला. त्याने त्यावेळी शाकुंतल या ग्रंथाबद्दल काढलेले उद्गार असे आहेत. '
वसंतऋतूतला मोहोर **क्रमशः**



## आनंदी पहाट

### मनात घर करून राहणारं घर असावं

आधुनिक केसरी

आपल्या शरीरासाठी तो केवळ निवारा असतो तर मनासाठी मात्र खूप काही असतं. आपल्या घरात आपण अनुभवलेला प्रत्येक क्षण आपल्यासाठी विलक्षण असतो. आपण जे काही अनुभवत असतो त्यांचा आपल्या मानसिकतेवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम नेहेमी होत असतो. आपण आणि आपलं अंतर्मन देखील याचा प्रत्यय घेत असतं. आपल्या लहानपणापासूनच "घर" या विषयीची अनेक गाणी, गोष्टी आपण ऐकलेल्या असतात. मग तो चॉकलेटचा सोनेरी चमचमता बंगला असेल किवा चिऊताईच्या घराची गोष्ट असेल. अगदी लहानपणापासूनच आपल्या मनात घर करून राहिलेल्या "घर" या संज्ञेशी आपलं एक प्रकारे निराळंच नातं निर्माण झालेलं असतं. सतत कानावर पडणाऱ्या "घर" या शब्दाचं एक प्रचंड आकर्षण लहानपणापासून आपल्याला वाटत असतं. घरातलं मन आणि मनातलं घर यांचं नातं अगदी दुध पाण्यासारखं असतं. सहजासहजी ते वेगळं करता येत नाही. "घर" या संज्ञेनी एकप्रकारे आपल्या मनातच घर करून ठेवलेलं असतं. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या घरासाठी बनवलेल्या अंतर्गत संरचनेशी असतो. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वानुसार घराची अंतर्गत संरचना ठरत असते. त्यामध्ये त्या व्यक्तीच्या अपेक्षा, गरजा, आवडी निवडी, अंगभूत कलागुण, छंद, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण या सर्व बाबींवर घराची बाहय तसेच अंतर्गत संरचना आणि सजावट करण्याचं ठरवावं लागतं. एखाद्या घराची अंतर्गत संरचना संबंधित कुटुंबियांच्या प्रत्येकाचं व्यक्तिमत्व खुलवत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



**झालास तू त्राता | पांडुरंगा ||**
**वंचनेची बाधा | सुटता सुटेना ||**
**जीवाची ह्या दैना | जन्मभर ||१||**
**सुख शांती नाही | भेटली संसारी ||**
**आपुलाचि वैरी | होत गेलो ||२||**
**प्रारब्धाचे भोग | दोषाचे कारण ||**
**आनिका दूषण | द्यावे कैसे ? ||३||**
**संन्यस्त वृत्तीचा | झालो मी प्रवासी ||**
**प्रगटे उदासी | अंतरात ||४||**
**पूर्व संचिताने | नाम तुझे घेता ||**
**झालास तू त्राता | पांडुरंगा ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**अपरिहार्यता ही नैसर्गिक असते. थंडीत उबदार कपडे वापरावेत तसे तिला सामोरे जाण्यात शहाणपण आहे. म्हणून जेव्हा एखादे कार्य आपण करू शकत नाहीत तेव्हा अनेक कार्यक्षेत्र आपली वाट पाहत आहेत; त्याकडे लक्ष पुरवा.**

**अभ्यासाने अशक्य काही नाही आणि उत्साहाविना अभ्यास नाही. या सोत्साह अभ्यासालाच आमच्या ऋषींनी तप ही संज्ञा दिली आहे.**


## भगवंताला पाहण्यास स्वांतर शुद्ध करावे



आधुनिक केसरी

'अंते मतिः सा गतिः' असे एक वचन आहे. जन्माचे खरे कारण शोधून पाहिले तर हेच आढळेल की, वासनेमुळे जन्माच्या फेऱ्यात आपण सापडलो. जन्माच्या पाठीमागे मरण हे ठेवलेलेच असते. जन्ममरणाचा ओघ सतत चाललेला आहे. वासना आधी का जन्म आधी, या वादात पडणे म्हणजे बीज आधी का झाड आधी यासारख्या, जगाच्या अंतापर्यंत कधी न सुटणाऱ्या प्रश्नाबद्दल काथ्याकूट करणे होय. आपल्याला नडते कुठे ते पाहावे. विषयांतच आम्ही गुंतून राहतो ते सोडावे. असत्यातूनच सत्य कसे जाणता येईल ते पाहावे. इथून कुणीतरी गेले, असे सावलीवरून आपण म्हणतो. त्याप्रमाणे ही जगत्रूप सावलीच आहे. तिला असणारे खऱ्याचे अधिष्ठान जो ईश्वर, त्याला आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करू या. आपल्या डोळ्यांवर विषयाची धुंदी असल्यामुळे, सर्व ठिकाणी भरलेला भगवंत आपल्याला नाही पाहता येत. त्याला पाहण्यासाठी दृष्टी निराळी करावी लागते. आपण आपले अंतरंग साफ केले तर तशी दृष्टी येते. आपण कोणा स्त्रीकडे पाहू लागलो तर आपली जशी वृत्ति असेल तशी ती दिसते; कामी असेल त्याला ती तशी दिसू लागेल, आणि सात्त्विक असेल त्याला ती मातुःश्रीच दिसू लागेल. म्हणून काय, की जोपर्यंत आपले अंतःकरण शुद्ध नाही तोपर्यंत आपल्याला सर्वत्र भगवंत दिसणार नाही. भगवंत सर्व ठिकाणी पाहताना तो आपल्यातही आहे हे पाहिले पाहिजे. जोपर्यंत भगवंत आपल्यात आहे हे दिसून येत नाही, तोपर्यंत तो इतरांत असलेला आपल्याला दिसणार नाही. म्हणून भगवंत सदासर्वकाळ आपल्यात आहे हे पाहू लागले पाहिजे. सद्गुरु सांगेल तसे वागावे. त्यामुळे आपला अभिमान नाहीसा होतो. संतांचा थोडासा कटाक्ष जो कर्ममार्गावर आहे तो याचकरिता की, कर्म करण्याने अभिमान येतो, आणि त्याउलट, गुरुआज्ञेत वागल्याने तोच अभिमान नाहीसा होतो. इथे शंका वाटेल की, गुरू तरी नामस्मरण करायलाच सांगतात, म्हणजे कर्म आहेच ना ! वैद्याने एका रोग्याला सांगितले की तू काही खाऊ नकोस. त्याला वैद्याने औषधाच्या तीन पुड्या दिल्या, आणि त्या तीन वेळा घे म्हणून सांगितले. त्यावर तो रोगी म्हणाला, " तुम्ही काही खाऊ नको म्हणता, आणि या पुड्या घ्या म्हणून सांगता, हे कसे ? " त्यावर वैद्याने सांगितले, "पूर्वी जे अजीर्ण झाले आहे त्याचा नाश करण्यासाठी या पुड्या उपयोगी आहेत." त्याप्रमाणे, गुरू आपल्याला नामस्मरण करायला सांगतात ते पूर्वीचा विषयाचा अनुभव नष्ट करण्यासाठी. जो आपली विषयवासना कमी करून आपल्यामध्ये नामाचे प्रेम उत्पन्न करील तोच खरा सद्गुरू होय.
**आजचे बोधवचन आहे –** प्रपंच व परमार्थ यांचा छत्तिसाचा आकडा पाहून, संतांनी तडजोड करण्याचा प्रयत्न केला, नामस्मरण करीत करीत प्रपंच करा, हीच ती तडजोड.

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**नभी वावरे जो अणुरेणु काही।**
**रिता ठाव या राघवेंवीण नाही।**
**तया पाहता पाहता तेचि जालें।**
**तेथे लक्ष आलक्ष सर्वे बुडाले।।१९६।।**

**श्लोकार्थ :**
आकाशामध्ये जे सुक्ष्मातिसूक्ष्म जडद्रव्याचे कण वावरतात त्यांच्यामध्येही ते परमात्मस्वरूप भरून आहे. त्या स्वरूपावाचून रिकामी जागा कोठेच नाही. त्या स्वरूपाला पाहण्याचा अभ्यास केला तर पाहणारा तेच बनून जातो. मग तेथे दृश्य व अदृश्य सारेच परमात्ममय होऊन जाते.

**विवेचन :** माती, दगड, झाडे, पशुपक्षी, मानव, पंचमहाभूते, इ.मिळून हे विश्व बनते. आकाशात अनेक कण असतात, मनुष्याच्या डोळ्यांनी ते सहज दिसत नाहीत, परंतु उन्हाची तिरीप आली की त्यात मुक्तपणे उडणारे अनेक बारीक बारीक कण मनुष्याला सहज दिसतात. या सूक्ष्म जीवात देखील परमात्मा असतोच असतो, असे समर्थ आपल्याला सांगतात. काही वर्षांपूर्वी जगभरातील शास्त्रज्ञानी एकत्र येऊन पृथ्वीच्या पोटात महास्फोट घडविला आणि त्यांना पृथ्वीची उत्पत्ती 'देवकणा' मुळे झाली असावी असा शोध लावला. एका कणापासून हे विश्व निर्माण झाले असे आधुनिक विज्ञान सांगते आणि आर्य सनातन वैदिक हिंदू धर्म असे मानतो की जे पिंडात आहे तेच ब्रम्हांडात आहे. आपल्याकडे म्हण देखील 'पिंडी ते ब्रम्हांडी'. समर्थांचे समग्र साहित्य पाहिले तर त्यात अनेक वेगवेगळ्या देव देवतांच्या आरत्या, स्तोत्रे, वर्णने आढळतात. परंतु प्रभू रामचंद्र, रघुकुलतिलक, श्रीराम, राघव, हे त्यांचे विशेष श्रद्धास्थान असल्यामुळे परमेश्वर, परब्रह्म किंवा एकंदरीत ईश्वरतत्व यासाठी ते रामाच्याच नावाचा उल्लेख करताना दिसतात. या श्लोकात देखील ते आकाशात, किंबहुना संपूर्ण आसमंतात वावरत असलेल्या अणुरेणूंमध्ये अस्तित्व असलेल्या परब्रह्म ईश्वरतत्वाला राघव असे संबोधतात आणि म्हणतात की या राघवाने व्यापल्यामुळे आसमंतात रिकामी अशी जागाच उरलेली नाही. जी काही जागा आहे ती सारी त्यानेच व्यापून टाकलेली आहे. साधनेनी वृत्ती तदाकार झाली तर बसल्या जागीच आपल्या परमात्मा भेटतो किंवा त्याचे अस्तित्व चराचरात जाणवते, असे सर्व संत सांगतात. भक्त प्रल्हादासाठी तो खांबात असतो तर एखाद्या भक्तासाठी तो जलचर होतो तर कधी भूचर होतो, कधी शस्त्र हाती घेतो, तर कधी सारथी होतो, पण तो सतत सोबत असतो हे मात्र खरं. आकाशातील धूलिकण असो वा इतर कोणताही कण असो, प्रत्येकात देवाचा अंशच नक्कीच आहे, असे सर्व संतांनी सांगितले आहे. सध्या विज्ञान इतके प्रगत झालं आहे की शेकडो मैल दूर असलेल्या अमेरिकेत बोललेलं आपण घर बसल्या ऐकू शकतो, परदेशातील खेळाचा सामना आपण घरबसल्या पाहू शकतो, कारण धुलीकणात, हवेत सुद्धा ऊर्जा वहन करण्याची क्षमता त्या परमेश्वरामुळेच असतेच असते. ज्याच्यामुळे आपण पृथ्वीवर सहज वावरतो त्या gravitational force ला मराठी मध्ये गुरुत्व असेच म्हणतात. हा योगायोग नक्कीच नसावा. हेच गुरुत्व म्हणजे परमात्मा सर्व विश्व व्यापून राहिला आहे. नदीने सागराला मिळण्याचा प्रयत्न करायचा, पण एकदा ती सागराला भेटली की नदीच सागर होऊन जाते. लोखंडाचे परिसस्पर्शाने सोने होते, पण ते बघायला लोखंड लोखंड राहातच नाही, चांगले ज्ञान प्राप्त करून शिष्य सद्गुरु झाला की तो कायमच सद्गुरु राहतो. मग त्यातील द्वैत नष्ट होते, दृष्टी विशाल होते आणि अनेकातील एकत्वाची अनुभूती आपल्याला येते. समर्थ म्हणतात, "उपासनेचे सेवटीं । देवां भक्तां अखंड भेटी । अवुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची ॥" परमेश्वरतत्व सामान्य मनुष्याच्या लक्षात येत नाही, त्याला ते दिसत नाही म्हणून ते अलक्ष्य असते. अलक्ष्य लक्षात यावे असे साधकाचे लक्ष्य असते आणि ते लक्ष्य साध्य व्हावे म्हणून साधकाने ध्यास घेतलेला असतो. असा ध्यास घेऊन त्याचे भक्तिपूर्वक साधन करता करता अशी एक वेळ येते, मुखातून असे एक नाम बाहेर पडते, एक क्षण असा येऊन जातो अलक्ष्य, लक्ष्य आणि लक्ष्यी (साधक) सारे एकरूप होऊन जातात.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६




# हरीश खंडेराव यांनी आंबेडकरी साहित्याचा नवा इतिहास निर्माण केला : डॉ. मुलाटे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हरीश खंडेराव हे आंबेडकरी साहित्यातील वेगळी वाट चोखाळणारे मुरती समीक्षक आहेत. त्यांनी दलित या शब्दाला प्रखर, विरोध करून आंबेडकरी साहित्य या संज्ञेचा पुरस्कार केला पण अस्मितादर्शने जी सामाजिक-सांस्कृतिक चळवळ उभी केली, तिचा हरीश खंडेराव यांनी मुक्त कंठाने गौरव केलेला दिसत नाही, असे उद्गार प्रख्यात कवी- समीक्षक, ज्येष्ठ पत्रकार डी. बी. जगत्पुरिया यांनी भाष्य करतांना काढले. आजारी असतानाही त्यांची वाङ्मयसेवा अविरत सुरु आहे. ती पुढेही दमदारपणे सुरू राहो ! यसेही ते म्हणाले. हरिश खंडेराव हे आंबेडकरवादी साहित्याचा पुरस्कार करणारे साहित्यिक आहेत. त्यामुळे दलित साहित्यिक, बौद्ध साहित्यिक त्यांच्या भुमिकेशी सहमत नसले, त्यांच्याच वैचारिक मतभेद असले तरी हरिश खंडेराव यांनी सात खंड लिहुन आंबेडकरी साहित्याचा नवीन इतिहास निर्माण केला हे नाकारून चालणार नाही, असे गौरोद्गार जेष्ठ साहित्यिक तथा समीक्षक डॉ. वासुदेव मुलाटे यांनी काढले. ते आज 1 जानेवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात प्रज्ञा प्रकाशन आणि सम्राट विचार मंच आयोजित जेष्ठ साहित्यिक हरिश खंडेराव यांच्या आंबेडकरी चळवळ आणि साहित्यः सांस्कृतिक इतिहास, अस्मितादर्श साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणेः वाङ्मयीन चर्चा या ७ व्या खंडाच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी उद्घाटकीय भाषणातुन बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पुरूषोत्तम पाटोदकर म्हणाले, हरीश खंडेराव यांनी बुद्धाची चिकित्सक मांडणी आपल्या साहित्यातून आंबेडकरी जाणिवेचा नवीन विचार समाजासमोर मांडला.त्यांच्या आंबेडकरी वैचारिक भूमिकेचे सकारात्मक दृष्ट्या साहित्यिक तसेच सामाजिक क्षेत्रातील लोकांनी स्वागत केले पाहिजे. जेष्ठ कवी डी. बी. जगत्पुरीया यांनी अस्मितादर्श साहित्य संमेलन आणि दलित साहित्यावर भाष्य केले.पुढे बोलतांना डॉ वासुदेव मुलाटे म्हणाले की, मिलिंद महाविद्यालयातुन डॉ म ना वानखडे यांनी नवख्या विध्यार्थ्यांसाठी अस्मिता या भिंतीपत्रकातुन लेखनाची, साहित्याची चळवळ उभी केली. दलित साहित्याला अभिजात साहित्याने नाकारल्यामुळे ही चळवळ प्रखरपणे वाढू लागली. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी त्याचे अस्मितादर्श असे नामकरण करून हा वैचारिक वारसा पुढे नेला. मात्र हरिश खंडेराव यांचे लेखन वैचारिक संघर्ष उभा करणारे आहे.कार्यक्रमाच्या सुरूवातीला भिक्खु डॉ आनंद यांच्या बुद्ध वंदनेने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ सागर चक्रनारायण यांनी केले. सूत्रसंचालन डॉ प्रज्ञा साळवे यांनी केले तर आभार अमरदीप वानखडे यांनी मानले. यावेळी डॉ यशवंत भंडारे, प्रा. भारत सिरसाट, प्रा. शिलवंत गोपनारायण, प्रा. रमेश वाघ, डॉ. बलराज पांडवे, डॉ. प्रेमराज वाघमारे, प्रा. गणेश पानझडे, डॉ. सुनीता सावरकर, बि.डी. धाकडे, नरेंद्र आटोटे, गोमाजी तायडे आदींसह नागरीक उपस्थित होते.

# रेकॉर्डवरच्या खुन्याने दिला मित्रांकडे ठेवायला गांजा; पण गुन्हेशाखेने मित्रांनाही ठोकल्या बेड्या

## २३ कि. गांजा जप्त; फॉरेन्सिक लॅबच्या उपस्थितीत कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ३१ डिसेंबरच्या सेलिब्रेशनसाठी रेकॉर्डवरील खुन्याने आणलेला गांजा पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी दोन सख्या भावांना दिला.पण गुन्हेशाखेने दोन्ही भाऊ २३किलो गांजा( साडेचार लाख रु किमतीचा) १७ लाख रु.च्या कारसहित पकडला व पुढील कारवाईसाठी सिडको औद्योगिक पोलिसांच्या हवाली केला. उमेर(२८) आणि अकबर(२६) इक्बालखान रा.यासिननगर हर्सूल या दोन्ही भावांकडे दिला.पण गुन्हेशाखेने दोन्ही भावांना ४.लाख ५४हजारांच्या गांजासहित बेड्या ठोकल्या वरील दोन्ही आरोपी सख्खे भाऊ आहेत, चिकलठाण्यात राहणारा रेकॉडवरील खुनी सय्यद युनुस सय्यद मलिक रा.पुष्पा गार्डन चिकलठाणा. याला सहा वर्षांपूर्वी खुनाच्या गुन्ह्यात पोलिसांनी अटक केली होती.तो आरोपींचा मित्र आहे.पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी सय्यद युनुस ने मित्रांना २२कि. ७०० ग्रॅम गांजा सांभाळण्यास दिला होता.तो गांजा घेऊन आरोपी स्वताःच्या स्कोडामधून घरी जात असतांना काल दुपारी २ वा. केंब्रीज शाळेसमोर गुन्हेशाखेच्या पथकाने पकडले. कारवाई करत असतांना फॉरेन्सिक लॅब चे अधिकारी व व वजन काटा करणारे उपस्थित होते.यावेळी कारची झडती घेत गांजाचे वजन केले.त्यावेळी २२कि.६०० ग्रॅ. भरले.वरील कारवाई पोलिस आयुक्त डॉ.निखील गुप्ता, उपायुक्त अपर्णा गिते, सहाय्यक पोलिसआयुक्त विशाल ढुमे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय मनोज शिंदे, काशिनाथ महांजोळ, डॉ. गोविंद भोसले व रवी जैस्वाल, पोलिस कर्मचारी संतोष सोनवणे,चंद्रकांत गवळी, दत्तात्रेय गढेकर,भगवान शिलोटे, राजेंद्र चौधरी यांनी सहभाग घेतला होता.



# फुलंब्री येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आज फुलंब्री हॉटेल असोसिएशनच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज फुलंब्री येथे त्यांच्या प्रतिमेस नगराध्यक्ष सुहासभाऊ शिरसाठ यांच्या उपस्थित पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी हॉटेल असोसिएशन तालुका अध्यक्ष लुखमान शहा, तालुका कार्याध्यक्ष राम बनसोड, उपाध्यक्ष सागर गाडेकर, सचिव सुनील शेवाळे, सरचिटणीस अरविंद काथार, गमन जाधव, देवराव राऊत, एकनाथ पंडित, सुमित प्रधान, गजानन नागरे, रवींद्र काथार, बाबासाहेब शिंनगारे, पवन घोडके, अभिषेक जाधव, गणेश तारू, मनोज चिकटे, नवनाथ शेवाळे, ज्ञानेश्वर जाधव, किशोर चव्हाण, बंडू ढोके, संजय वाघ, सागर माठे, शिवानंद राऊत, ऐसान शहा, कडूबा काळे व सर्व तालुका हॉटेल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पद्मश्री लावणीसम्राज्ञी सुलोचनाताईंना अभिवादनासाठी स्वरांजलीचे आयोजन

## प्रसिद्ध ढोलकीवादक विजय चव्हाण यांची ढोलकीची जादू ऐकायला मिळणार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** पद्मश्री लावणीसम्राज्ञी स्व. सुलोचनाबाई चव्हाण यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी त्यांनी गायलेल्या निवडक गाण्यांच्या स्वरांजली कार्यक्रमाचे आयोजन 7 जानेवारी 2023 रोजी सायं. 7 वाजता भारतीय विद्या भवन गिरगाव चौपाटी मुंबई येथे करण्यात आले आहे. नामदार मंगलप्रभात लोढा (पर्यटन, कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविण्यता मंत्री महाराष्ट्र राज्य) यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. ॲड. शशिकांत पवार (अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघ) कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तर सिनेसृष्टीतील नामवंत कलाकार अतुल काळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी स्व. सुलोचनाबाईचे चिरंजीव प्रसिद्ध ढोलकीवादक विजय चव्हाण यांच्या ढोलकीची जादुई ऐकावयास मिळणार आहे. विजय चव्हाण यांना सुभाष खरोटे हार्मोनियमवर साथसंगत करणार आहेत. त्याचबरोबर पद्मश्री स्व. सुलोचनाबाई चव्हाण यांनी गायलेल्या हिंदी मराठी गाण्यांचा कार्यक्रम स्वरमाला याप्रसंगी सादर होणार आहे, अशी माहिती सुलोचनाबाईंचे चिरंजीव प्रसिद्ध ढोलकीवादक विजय चव्हाण यांनी दिली.



# फुलंब्री येथे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे मराठवाडा अर्बन को-ऑपरेटिव्ह शाखा फुलंब्री तेथे शेकडो वर्षांचा अंधार आणि त्याला भेटणारी ती मशाल संघर्ष आणि क्रांती म्हणजे आपली सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव बँकेचे अध्यक्ष पवन तिवारी बँक मॅनेजर सुनील ढोके यांच्यासह आधी कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# एक रुपयात पेन्सिल तरी येते का? धनंजय मुंडेंचा सवाल

## सावित्रीच्या लेकींना तीस वर्षांपासून दिले जाणारे दैनंदिन एक रुपया अनुदान वाढवून प्रतिदिन २० रुपये करावे; धनंजय मुंडे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यात पहिली ते चौथीत शिकणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमाती आदी प्रवर्गातील सावित्रीच्या लेकींना मागील ३० वर्षांपासून नियमित शाळेत येण्यासाठी दिले जाणारे दैनंदिन १ रुपया प्रोत्साहनपर अनुदान वाढवून प्रतिदिन किमान २० रुपये करावे, अशी मागणी माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

धनंजय मुंडे यांनी स्वतः ट्विट करून ही माहिती दिली असून आजच्या या महागाईच्या जमान्यात एक रुपयात साधी पेन्सिल तरी मिळते का? असा प्रश्न उपस्थित करत, सावित्रीमाईंच्या जयंतीच्या निमित्ताने या योजनेचे पुनरावलोकन करून अनुदान प्रतिदिन किमान २० रुपयांपर्यंत वाढविण्याचा निर्णय राज्य शासनाने घ्यावा अशी मागणी केली आहे.

धनंजय मुंडे यांनी लिहिलेल्या पत्रात, सन १९९२ साली तत्कालीन राज्यसरकारने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून व त्यांनी दाखवलेला स्त्री शिक्षण व सक्षमीकरणाचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आदिवासी क्षेत्राबाहेरील आर्थिक दुर्बल घटकातील तसेच अनुसूचित जाती- जमाती व भटक्या जमातींमधील पहिली ते चौथीमध्ये शिकणाऱ्या मुलींची पटसंख्या वाढावी तसेच गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने पहिली ते चौथीत शिकणाऱ्या मुलींना प्रोत्साहन पर उपस्थिती भत्ता देण्यासाठी 'दुर्बल घटकातील मुलींना शाळेत नियमित येण्यासाठी उपस्थिती भत्ता' देण्याचा शासन निर्णय घेतला होता. याअंतर्गत प्रति विद्यार्थिनी, प्रतिदिन १ रुपया प्रमाणे भत्ता निश्चित करण्यात आलेला असून, वर्षातील एकूण उपस्थितीचे २२० दिवस ग्राह्य धरून याप्रमाणे भत्ता दिला जातो. सदर योजनेतील भत्ता वितरीत करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ मध्ये अद्याप निधीही उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती निदर्शनास आली आहे. मागील सुमारे तीस वर्षांपासून या योजनेत काहीही बदल करण्यात आलेले नाहीत. देशाचा स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव आपण साजरा करत असताना दुसरीकडे महागाई आकाशाला गवसणी घालत आहे. अशा परिस्थितीत सावित्रीमाईंच्या नावाने दिल्या जाणाऱ्या या भत्त्याची एक रुपया रक्कम ही शालेय मुलींची चेष्टा करणारी असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

आजच्या बाजार भावानुसार एक रुपयात एक पेन्सिल मिळणे सुद्धा दुरापास्त आहे असे असताना शालेय मुलींना उपस्थिती प्रोत्साहन देण्यासाठी दिला जाणारा तुटपुंजा भत्ता देखील वाढविण्याची गरज असल्याचे धनंजय मुंडे यांनी पत्रात म्हटले आहे. आज सावित्री माईंची जयंती आपण उत्साहात साजरी करत आहोत, सावित्रीमाईंनी सामाजिक विरोध झुगारून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलींना ज्ञानदानाचे पवित्र काम करून स्त्री शिक्षणाची दारे खुली केली. याच पार्श्वभूमीवर बालिका दिनाचे निमित्त साधून शासनाने वरील योजना सुरू केलेली आहे. सध्याच्या आधुनिक युगात देश डिजिटायझेशनकडे वाटचाल करत असताना शिक्षण व त्याला पूरक साधनांमध्ये देखील आमूलाग्र बदल झाले आहेत. या बदलांना अनुसरून व आधुनिक शिक्षण पद्धतींचा अवलंब करून प्राथमिक शिक्षण प्राप्त करण्यासाठी उपरोक्त योजनेचे पुनरावलोकन करून त्यात बदल करणे गरजेचे आहे. तसेच याअंतर्गत मुलींना दिला जाणारा दैनंदिन भत्ता १ रुपयावरून वरून प्रतिदिन किमान २० रुपये करणे देखील गरजेचे आहे; असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने या योजनेचे पुनरावलोकन करून दैनंदिन भत्ता वाढ करण्यासाठी राज्यशासन स्तरावरून एका बैठकीचे तातडीने आयोजन करून निर्णय घ्यावा, अशी मागणीही धनंजय मुंडे यांनी केली आहे.

# गांगुली परतणार

आधुनिक केसरी

भारतीय क्रिकेटमधील दादा अशी ओळख असणाऱ्या सौरव गांगुलीवर आयपीएल (IPL) फ्रँचायझीचीनी जबरदस्त खेळी करत मोठी जबाबदारी दिली आहे. त्यामुळे सक्रीय स्वरुपात गांगुली पुन्हा आयपीएलमध्ये वेगळ्या भूमिकेत दिसणार. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) माजी अध्यक्ष सौरव गांगुली इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) परतणार आहेत. टीम इंडियाचा माजी कर्णधार गांगुलीला दिल्ली कॅपिटल्सचे संचालक बनवले जाऊ शकते.

गांगुलीने यापूर्वी ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली दिल्ली कॅपिटल्ससाठी हे पद भूषवले आहे. वृत्तसंस्थेतील पीटीआय मधील वृत्तानुसार, गांगुली ILT20 आणि CSA टी२० लीगमध्ये दुबई कॅपिटल्स आणि प्रिटोरिया कॅपिटल्सची जबाबदारी देखील घेतील, जे या महिन्याच्या शेवटी संयुक्त अरब अमिराती (UAE) आणि दक्षिण आफ्रिकेत सुरू होणार आहेत. अहवालानुसार, आयपीएल २०२३ मध्ये दादा दिल्ली कॅपिटल्सचे क्रिकेट प्रमुख असतील. तुम्हाला सांगूया की सौरव गांगुली बीसीसीआय प्रमुख होण्यापूर्वी दिल्ली कॅपिटल्सशी संबंधित होता. गांगुली यापूर्वी २०१९ मध्ये दिल्ली कॅपिटल्सचे मार्गदर्शक होते, परंतु बीसीसीआयच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर वर्षाच्या उत्तरार्धात त्यांनी ही भूमिका सोडली. याचा अर्थ असा होईल की भारतीय क्रिकेटचे दिग्गज दिल्ली कॅपिटल्सचे मुख्य प्रशिक्षक रिकी पाँटिंग यांच्याशी जवळून काम करतील. पाँटिंग आणि गांगुली यांनी लीगच्या २०१९ हंगामातही एकत्र काम केले होते. गांगुलीच्या पहिल्या प्राधान्यांपैकी एक म्हणजे इंडियन प्रीमियर लीग (IPL) च्या २०२३ हंगामासाठी नवीन कर्णधार निवडणे, कारण कार अपघातानंतर ऋषभ पंत या हंगामात खेळण्याची शक्यता नाही. पंतला सध्या डेहराडूनमधील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तो खेळात केव्हा परत येईल याचा अंदाज नाही.

सौरव गांगुली आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्स आणि पुणे वॉरियर्सकडून खेळला आहे. तो २०१२ मध्ये पुण्याकडून अखेरचा लीग खेळला होता. आयपीएलच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दादांनी दिल्ली कॅपिटल्समध्ये सामील होण्यास होकार दिला आहे आणि सर्व आवश्यक कागदपत्रे पूर्ण झाली आहेत. अशा परिस्थितीत तो तीन वर्षांनंतर एकदा दिल्ली कॅपिटल्सच्या ताफ्यात दिसणार आहे. २००८ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर गांगुलीने बंगाल क्रिकेट बोर्डाचे अध्यक्षपद स्वीकारले आहे. ते बीसीसीआयचे अध्यक्षही राहिले आहेत. ते २०२२ मध्येच या पदावरून पायउतार होतील. त्याची जागा माजी क्रिकेटपटू रॉजर बिन्नी यांनी घेतली.

# छत्रपती संभाजी राजे यांच्याशी गल्लत करू नका



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रात महापुरुषांबाबत आक्षेपार्ह विधान करण्यात येत आहेत. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि भाजपा-शिंदे गटातील आमदारांनी महापुरुषांबाबत केलेल्या वक्तव्यावरून विरोधी पक्षाने हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी पक्षाला घेरलं होतं. त्यात अधिवेशनात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावरून टीकास्त्र सोडलं जात आहे. काय म्हणाले होते अजित पवार? हिवाळी अधिवेशनात बोलताना अजित पवार म्हणाले होते, "आपण छत्रपती संभाजी महाराज यांचा उल्लेख स्वराज्यरक्षक असा करतो. पण, त्यांना काही लोक धर्मवीर म्हणत आहेत.**

छत्रपती संभाजी महाराज धर्मवीर नव्हते. संभाजी महाराजांनी कधीही धर्माचा पुरस्कार केला नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांनीही हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती," असं अजित पवारांनी म्हटलं होतं. अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मातब्बर राजकारणी,उपख्यमंत्री, अर्थमंत्री व विरोधी पक्षनेते म्हणून भूमिका पार पाडलेली आहे. सध्या ते विरोधी पक्ष नेता आहे. इतक्या मातब्बर राजकारणी नेत्याने संभाजी राजांबदल बेधडक बोलणे सर्थनिय नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन संपूर्ण हिंदुस्थानाला तोंडात बोटे घालायला लावणारा प्रचंड पराक्रम संभाजी महारांजी केला. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर किंवा त्यानंतरही अनेक मोहिमा संभाजी राजेंनी यशस्वीपणे राबवल्या. कोणत्याही मोहिमेत त्यांना कधीच अपयश आले नाही. छत्रपती संभाजी महाराजांना टक्कर देईल, असा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता. संभाजी राजे हे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असमान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी, व्यासंगी, आदर्श महावीर, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांबद्दल काही गोष्टी आपल्याला माहिती असायलाच.

दि. ६ जानेवारी १६८१ रोजी छत्रपती संभाजी महाराजांनी गोपळभट अग्निहोत्री महाबलेश्वरकर यांच्या पुत्रास लिहिलेल्या पत्रात एक अतिशय समर्पक असे वाक्य आले आहे. ते वाक्य असे, ..राजश्री आबासाहेबांचे जे संकल्पित आहे ते चालवावे हे आम्हास अगत्य... युवराज शंभू राजे छत्रपती झाल्यानंतर त्यांचे अलौकिक आणि अद्‌भुत अशा कार्याचा जर कुणी आढावा घेतला तर त्याला पदोपदी या वाक्याची प्रचीती येते. त्यांचे राजकीय धोरण, आर्थिक धोरण, प्रजाहितदक्षता या सर्व बाबींमध्ये त्यांनी आपल्या अद्वितीय अशा वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवलेला दिसतो.

या प्रमाणेच त्यांच्या धार्मिक धोरणावरही छत्रपती शिवाजी महाराजांचाच ठसा कोरलेला आढळतो.

संतजनांस राजाश्रयः

१. संतश्रेष्ठ जगद्‌गुरू तुकाराम महाराज यांचे पुत्र महादोबा गोसावी यांस छत्रपती संभाजी महाराजांनी वर्षासनाची नेमणूक करून दिली. (दि. १९ ऑगस्ट १६८०)

२. शिवकालातील प्रसिद्ध पाटगावचे मौनीबाबा यांच्या पालखीस भोई व वाजंत्रीची कायमची व्यवस्था लावून दिली. त्यासाठी वार्षिक १२५ होनांचे आज्ञापत्र करून दिले. (दि.१३ सप्टेंबर १६८०)

३. समर्थ रामदास स्वामींनी अंगापूरच्या डोहात मिळालेल्या



राममूर्तीची चाफळ येथे स्थापना करून मंदिर उभारले. तेथील पूजेअर्चेसाठी व नैवेद्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी चैत्र शु. १ शके १५९७ रोजी सनद करून दिली. तीच पुढे छत्रपती संभाजी महाराजांनी चालू ठेवली. तसेच चाफळच्या यात्रेस जमणाऱ्या भाविकांना लष्करातील लोकांचा अथवा मुसलमानी सैन्याचा त्रास होऊ नये व यात्रा यथासांग पार पडावी म्हणून वासुदेव बाळकृष्ण या आपल्या अधिकाऱ्यास आज्ञापत्र लिहिले. (दि. १८ ऑक्टोबर १६८०)

४. चिंचवडचे श्री मोरया गोसावी यांच्या 'माणसांस, शेतापोतांस तसेच गुरांढोरांस काडीचाही तसविज देऊ नये' यासाठी आपल्या लष्करी अधिकाऱ्यास ताकीदपत्र लिहिले. (दि. ६ नोव्हेंबर १६८०)

५. प्रचंडगडाच्या पायथ्याशी गडाच्या संरक्षणासाठी आलेल्या लोकांच्या गाई व म्हशी यांची चराई (वणी) छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजी महाराजांनी पण माफ केली (दि. ३१ मार्च १६८१)

६. श्री समर्थांनी अवतारकार्य पूर्ण केल्यावर त्यांच्या मागे सज्जनगड व चाफळ येथील धर्मादाय ऐवज, उत्सव, देवस्थानांची व्यवस्था, यात्रा, समर्थांच्या निर्वाणस्थळी हनुमानाचे देवालय उभारणे इत्यादी गोष्टींकडे जातीने लक्ष पुरविले. त्या संबंधी आपल्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना, आज्ञा, प्रसंगी ताकीद व कडक शब्दात कानउघाडणी देखील केली आहे. या संबधी एका पत्रात संभाजी महाराजांनी कऱ्हाड प्रांताचा सुभेदार रंगो विश्वनाथ यांस श्रीचे कार्यास हैगै कराया तुम्हास काय गरज?... अशा स्पष्ट शब्दात खडसावले आहे.

७. चिंचवडच्या देवस्थानास आपल्या लष्कराकडून उपद्रव होतो अशी तक्रार आल्यावर छत्रपती संभाजी महाराजांनी पुणे प्रांताच्या सुभेदार व जुमलेदारांना ..जो धामधूम करील त्याला स्वामी जीवेच मारतील... अशी अत्यंत परखड शब्दात समज दिली आहे.

८. वाई प्रांताचा सुभेदार येसाजी मल्हार यास निंब येथील सदानंद गोसावींच्या मठास दरसाल नेमून दिलेला ऐवज पोचता न केल्याचे कळताच संभाजी महाराजांनी धर्मकार्यात खलेल न करणे. अशा शब्दांत ताकीद दिली आहे. व तेथील आनंदगिरी गोसावी यांना पत्र लिहून धर्माच्या कार्यास अंतर पडणार नाही... असे अभिवचन दिले आहे.

सक्तीने धर्मांतरास विरोधः

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतर करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज, व मुसलमान सत्ताधीशांना कडाडून विरोध केलेला दिसतो. छत्रपती संभाजी महाराज व हेनरी ग्यारी यांच्यात इ.स. १६८४ साली झालेल्या तहातील एक कलम आहे,'THAT THE ENGLISH SHALL BUY NONE OF MY PEOPLE BELONGING TO MY DOMINION, TO MAKE THEM SLAVES OR CHRISTIANS'

अंत्रुज परगण्यातील अडकोळण गावचा शिलालेखः

छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत मराठी राज्याचा अंमल गोमंतक परिसरात सुरू झाला. तेव्हापासून व्यापारी माणसांकडून घेण्यात येणारा अंगभाडे कर संभाजी महाराजांच्या आज्ञेने माफ करण्यात आला. या संबंधी फोंड्याजवळ अंत्रुज येथील हडकोळण या गावी एक शिलालेख आहे. या शिलालेखात संभाजी महाराजांनी मुख्याधिकारी मामले फोंडा धर्माजी नागनाथ यास करमाफीसंबंधी आज्ञा करताना मराठी अंमलाला उद्देशून खालील वाक्य कोरले आहे.

'...आता हे हिंदुराज्य जाहलेपासोन...पुढे या प्रमाणे सकळाहि चालवावे सहसा धर्मकृत्यास नाश करू नये करतील त्यांसी महापातक आहे...'

# जला जाणूया नदीला : शिवना नदी संवाद यात्रा



शांताराम मगर
संपर्क क्र. 9421417540

आधुनिक केसरी

**नदीप्रदूषण पूर्णपणे मानवनिर्मित आहे. दोन-अडीच दशकांपूर्वी राज्यातील नद्यांची स्थिती चांगली होती. मुले लहान वयातच नदीत पोहण्यात तरबेज व्हायची. पूर आला की, बिनदिक्कतपणे सूर मारायची. नदीला आता अवकळा आली. जीवनदायिनी मृतप्राय झाली आहे. जला जानुया नदीला या आभियाना अंतर्गत वैजापुर तालुक्यातील शिवना नदी स्वंवाद यात्रेला सुरुवात मालेगाव कन्नड येथुन सुरुवात करण्यात आली.**

झोलेगाव जांबरखेडा लाखणी मांडकी भायगा राजुरा लासुरखाव शाजापूर जळगावव येथे समारोप करण्यात आला यावेळेस लासुरगाव ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या वेश भाषा करत स्वंवाद यात्रेचे ढोल ताशा टाक मृदंगा वाजवत जंगी स्वागत करण्यात आले. यावेळेस उपजिल्हाप्रमुख विभागीय आधिकारी मानिक आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली .प्र.तहसीलदार महाजन गट विकास आधिरकारी हरकळ कुषी एधिकारी एच आर बोयनार संवाद यात्रेचे समन्वयक गोकुळ सुरासे सतिश वाघ विपीन साळे अर्जुन घोडके रुपके वाघ विस्तार आधिकारी आर आर शिनगारे वनविभाचे आधिकारी तलाठी मंडळ आधिकरी पुरी मॅडम तहसिलचे जाधव जालिंदर वाघ प्रविण गायकवाड मेजर पढाण काशीराम शेजुळ शांताराम मगर ग्रामसेवक सरपंच पोलीस पाटिल गावकरी यांचा मोठा सहभाग होता.पुढे बोलताना संवाद यात्रेचे समन्वयक गोकुळ सुरासे म्हणाले जलदाहिनी समझल्या जाणार्या नद्या बेसुमार जंगलतोड आतिक्रमण आणि अनियंत्रित वाळूउपशाने नद्यांची दुरवस्था आहे.येथील जमीन खडकाळ असल्याने पाणी जिरण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने नद्या पावसाळ्यातच वाहतात. शिवना नदि काठ सुजलाम-सुफलाम आहे. नद्यांचा प्रवाह खंडित झाल्याने जलसंस्कृती लोप पावली आहे. वाहणाऱ्या नद्या आहेत; परंतु नियोजनाअभावी दरवर्षी टंचाईचा सामना करावा लागतो. पाण्याचे स्त्रोत घटता आसुसून शिवना गोदावरी,पाऊस होऊनही टंचाईला सामोरे जावे लागते.आसे सुरासे यांनी सागितले. तर विपीन साळे यांनी प्लास्टिक बॉटल मध्ये कचरा भरून विविध प्रात्यक्षिक सादर करून कचरा, सांडपाणी व मैलामिश्रित पाण्यामुळे नदी प्रदूषित आहे. का होते नदी धूप थांबविणारी वनसंपदा नष्ट, खोऱ्यात जंगलतोड नदीकाठावरील



सिमेंट, डांबरी रस्त्यांमुळे भूगर्भात पाणी न मुरणे अखंड प्रवाहाचे भूमिगत झरे, कुंड आटणे; त्यांचे नाल्यात रूपांतर,होऊन गावातीलघरगुती, दूषित प्रक्रियाविरहीत पाणी; तसेच घनकचरा नदीत टाकणे निर्माल्य विसर्जित करणे सौंदर्यीकरणाच्या नावाखाली नदीकाठावर काँक्रिटीकरण, पात्रात वीटभट्ट्या आणि अतिक्रमणेपरिणाम नदीप्रदूषणाचे मगरी, मासे, पाणपक्षी, कासव, खेकडे, झिंगे यांच्या प्रजाती धोक्यात आल्या आहे नद्यांभोवती वृक्षारोपण करणे नद्यांचे खोऱ्यातील भूजलस्तर वाढवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे प्र तहसिलदार महाजन यांनी आवाहन केले.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सामाजिक कार्यश्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**सिंधुताई सपकाळ या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या विशेषतः भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांना नुकताच २०२१मध्ये सामाजिक कार्य श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या वेळोंवेळी अनेक गौरवांच्या मानकरी ठरल्या. सिंधुताईंना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांतील पद्मश्री पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार, मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार, आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनचा दत्तक माता पुरस्कार, सोलापूरचा डॉ.निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार,राजाई पुरस्कार, शिवलीला महिला गौरव पुरस्कार, श्रीरामपूर अहमदगर जिल्हा येथील सुनीता कलानिकेतन न्यासातर्फे कै.सुनीता त्र्यंबक कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार, सीएनएन- आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनने दिलेला रिअल हीरो पुरस्कार, दैनिक लोकसत्ताचा सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार, प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार, डॉ.राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार, पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार आदींचा समावेश आहे.**

सिंधुताईंचा जन्म आणि त्यांचे सुरवातीचे जीवन खडतर होते. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १९४७ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात आणि ब्रिटीश भारतातील बेरार येथील अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला. एक अवांच्छित मूल असल्याने त्यांचे नाव चिंधी- फाटलेल्या कापडाचा तुकडा ठेवले. पण हीच चिंधी अनेक फाटक्या ठिगळांना जोडते, याचा त्यावेळी कोणी विचारही केला नसेल. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली. त्यांचे वयाच्या बाराव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लग्न झाले, जे त्यांच्यापेक्षा तब्बल  वीस वर्षांनी मोठे होते. लग्नानंतर त्या वर्ध्यातील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या. घरी प्रचंड सासुरवास होता. कुटुंबात शैक्षणिक वातावरण नाही. जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या तर त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत. अठराव्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वळणे, हाच व्यवसाय असायचा. गुरेही शेकड्यांनी असायची. त्यांचे शेण काढता काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही. रस्त्यावर मुरूम फोडणाऱ्यांना मजुरी, पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्टवाले करायचे. इथे सिंधुताईंनी बंड पुकारले आणि लढा सुरू केला. त्यामुळे या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गदा आली. हा लढा जिंकल्या पण त्यांना या लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली. ताईंच्या या धैर्याने गावातील जमीनदार, दमडाजी असतकर दुखावला गेला होता. जंगलखात्याकडून येणारी मिळकत बंद झाली. दमडाजीने सिंधुताईंच्या पोटातील मूल आपले असल्याचा प्रचार सुरू केला. नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारून घराबाहेर काढले. गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांना



सिंधुताई सपकाळ पुण्यस्मरण विशेष

कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. हे लग्न फार काळ टिकले नाही आणि वयाच्या वीसव्या वर्षीच त्यांना त्यांच्या मुलीसोबत नवऱ्याने सोडून दिले.     माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या, पण सख्ख्या आईनेही पाठ फिरवली. परभणी, नांदेड, मनमाड रेल्वे स्टेशनांवर त्या भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या. एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. त्या दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. परंतु तेथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनी २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना तेथे कायम राहता येणार नाही. म्हणून शेवटी सिंधुताईंनी स्मशान गाठले.     अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. सन १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली. आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. तेथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाऊ लागले. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जात असे. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. त्यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत त्या अशा- बाल निकेतन हडपसर, पुणे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा. अभिमान बाल भवन, वर्धा. गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा. ममता बाल सदन, सासवड. सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेशदौरे केले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या बोलण्याने आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन संस्थेची स्थापना केली आहे. त्यांना महानुभाव पंथाचा अनुग्रह होता. महानुभाव पंथाच्या नियमाप्रमाणे त्यांना भुमीडाग देण्यात आला.

अशातच सिंधुताईंवर दि.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये डायफ्रामॅटिक हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. त्यांच्यावर शस्त्रक्रियोत्तर काळजी घेण्यात येत होती. पाच वर्षांहून अधिक काळ ग्रस्त असलेल्या डायफ्रामॅटिक हर्नियामुळे त्यांचे डाव्या बाजुचे फुफ्फूस व्यवस्थितरित्या कार्य करीत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रकृती थोडी बरी झाली होती. तथापि, पाच दिवसांपूर्वी त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग वाढल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली, त्यामुळे त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि दि.०४ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ८ वाजून १० मिनीटांनी त्यांचे निधन झाले. पुणे येथील गॅलक्सी केर या दवाखान्यामध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. !! स्मृतिदिनी त्यांच्या ममत्वाला व कार्यकर्तृत्वाला मानाचा लवून मुजरा !!

# ई -कचऱ्याविषयी जागरूकता हवी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढतो आहे. उपयुक्तता संपलेल्या किंवा तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो.  हेच पहा ना आता लवकरच  5 जी तंत्रज्ञानाने युक्त मोबाईल लवकरच बाजारात येतील. रिलायन्स जिओ सह अनेक कंपन्यांनी त्याची चाचणी घेतली असून ती यशस्वी झाली आहे त्यामुळे लवकरच सर्वांच्या हातात 5 जी मोबाईल दिसतील. पण हे मोबाइल आल्यावर सध्या वापरात असलेले अब्जावधी मोबाईल अडगळीत पडतील.**

अडगळीत पडलेल्या या अब्जावधी मोबाईलची विल्हेवाट कशी लावायची हा मोठा प्रश्न भारतात आगामी दोन ते तीन वर्षात उभा राहणार आहे. ई कचऱ्याची ही समस्या केवळ भारतातच आहे असे नव्हे तर जगातील सर्वच देशात आहे. संयुक्त राष्ट्र संघाने ग्लोबल ई वेस्ट मॉनिटर २०२० नावाचा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार २०१९ या वर्षात जगभरात ५.३६ कोटी मॅट्रिक टन ई कचरा तयार  झाला आहे. या अहवालानुसार चालू दशकाच्या अखेरपर्यंत हा आकडा ७. ४ कोटी मॅट्रिक टनापर्यंत जाईल. भारताचा विचार केला तर २०१९ या वर्षात भारतात १० लाख १४ हजार ९६१ टन इतका कचरा तयार झाला. एकट्या दिल्लीत हे प्रमाण २ लाख टन इतके आहे.ही आकडेवारी  केंद्रीय पर्यावरण मंत्रालयानेच दिली आहे. ई कचऱ्याची इतकी गंभीर समस्या आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्याविषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याच्या निचरा देखील आपण इतर कचऱ्याप्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, सीडी, व्हीसीडी, फ्रीज, वाशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोवेव्ह, ओव्हन, हिटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू  निकामी झाल्या की त्याला ई कचरा असेंल्प संबोधले जाते. याचबरोबर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जशी, संगणक, मोबाईल, लॅपटॉप, फोन, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क इत्यादींचा ई कचऱ्यात समावेश होतो.  अशा प्रकारे निकामी झाल्याने फेकून दिलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे घटक पर्यावरणातील हवा आणि पाण्यात मिसळले की सभोवतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलच्या किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आद्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि माती दूषित करते.  अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी सुमारे तीस दशलक्ष संगणक निकामी झाली म्हणून फेकून दिले जातात. यांपैकी वीस टक्क्यांहुन कमी संगणकाचे पुनर्विनिकरण केली जाते. युरोपमध्ये तर ददरवर्षी   सुमारे शंभर दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, फेकून दिलेली ही इलेक्ट्रॉनिक उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे



फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरिलीयम, कॅडीमीयम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा  पर्यावरणाची मोठी हानी होते.  एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्यावर वेळीच आणि  गांभीर्याने उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन, त्याचे रिसायकलिंग आणि त्याचे री - मॅन्युफॅक्चरिंग महत्वाचे आहे त्यासाठी सार्वजनिक आणि खाजगी  क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाद्वारे सादर केलक्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

# स्पर्धेच्या युगात टिकून रहावे !

आधुनिक केसरी

आजच्या स्पर्धेच्या युगात सर्वत्र स्पर्धा निर्माण झाली आहे.जो वैळेला महत्व देईल तोच माणूस यशस्वी होईल.आज माणसाकडे २४तास आहेत .त्यातले १० ते १२ तास  जेवण ,झोप,इतर कामातच जातात.म्हणजेच प्रत्येकाला दिवसातले १२ते १४तास प्रत्यक्ष कामासाठी मिळत असतात. मग आपण ठरवायचे आयुष्यात वेळ कसा वापरायचा स्पर्धेत टिकायचे असेल तर वेळेला महत्व दिलेच पाहिजे. आपल्या जीवनात किती पावसाळे आले .हे महत्त्वाचे नाही .तर त्या चिखलातुन आपण कसा मार्ग काढतो .हे महत्त्वाचे आहे.आपल्याला हे आयुष्य लाभले आहे.त्याचा खर्या  अर्थाने सदुपयोग केला पाहिजे.जो झिजेल तोच  चमकेल.आज माणुस घड्याळाच्या काट्याशी स्पर्धा करत आहे.मिनिट मिनिट आपल्या आयुष्यात खुप महत्वाची आहेत.बर्याचजणांना वेळ अपुरा पडत आहे. वेळेचं गणित चुकत आहे.त्यासाठी योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.तनमनाने परीश्रम घेऊन कष्ट करण्याची तयारी दाखवली तर आयुष्यात काहीही कमी पडणार नाही.स्वताःला असे मजबुत बनवा नवनवीन अभुतपुर्व ज्ञान मिळवत रहा.ज्याला स्पर्धेत टीकून रहायचे आहे त्याला ज्ञानाशिवाय पर्याय नाही.ज्याच्याकडे  जास्त ज्ञान तोच माणुस श्रीमंत समजायला हवा. स्पर्धेत टीकून रहायचे असेल तर कोणतीही गोष्ट असु द्या .धाडस अंगी बाळगा धाडसाने आपण कोणत्याही कार्यात सहज यश मिळवु शकतो.मेहनत करा,धाडस आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या जोरावर आपण स्पर्धेच्या युगात टिकून राहू शकतो. येणार्या संकटाशी दोन हात करण्याची तयारी ठेवली पाहिजे.आयुष्यात काय घडेल हे आपल्याला सांगता येत नाही. त्यासाठी नेहमी कर्तव्यदक्ष  राहीले पाहिजे.आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून रहावयाचे असेल तर सृजनशीलता ,धडाडी, नावीन्यपूर्ण कल्पना याचा वापर केला पाहिजे.



# पालकांनो मुलांकडे दुर्लक्ष करू नका



भरत कोळी
धुळे

आधुनिक केसरी

**धुळे- २१ व्या शतकातील आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात मानवी जीवन हे धावत्या ट्रेनप्रमाणेचं वेगवान असेल असं मला कधी वाटलं नव्हतं, खरंतर महामूर्ख कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर मानवी समाजाची जी गतिशील वाटचाल सुरू झाली ती मानवाला कुठं नेऊन सोडेल याची शाश्वती देता येणार पण २१ व्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आपण विविध प्रकारे अधिकाधिक सर्तक असणं आवश्यक आहे कारण कधी कोणत्या संकटांना सामोरे जावं लागेल हे सांगता येणं ही थोडं अवघडच आहे.**

असो पण आजच्या आधुनिक युगात मानवाची वाटचाल ही गरजेनुसार व परिस्थितीनुसार निरंतर चालणारी प्रक्रिया हवी,पण हल्ली या प्रक्रियेचा हेतू बदलत एका विशिष्ट तऱ्हेने समाजाची वाटचाल ही अधोगतीकडे जात आहे की काय अशी वेळोवेळी शंका-प्रश्न निर्माण होतात, आजच्या २१ व्या शतकातात जरी विज्ञान,तंत्रज्ञानाच्या आधारावर आधुनिकीकरणाला, जागतिकीकरणाला,खाजगीकरणाला गती मिळाली असली तरी ती गती समाजासाठी फायदेशीर ठरेलचं अशी १००% शाश्वती देता येणं ही माझ्यामते कठीणचं आहे,म्हणुन आपल्या मुलांचा शैक्षणिक दर्जा वाढवा,त्यांच्या शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्नशील रहा भविष्यात निर्माण होणाऱ्या संकटांना सामोरे जाऊ शकतील असं सक्षम बनवा,त्याच्यातील कलागुण ओळखा व त्याला वाव द्या,त्याचा शारीरिक मानसिक,भावनिक,बौद्धिक,आर्थिक व सामाजिक विकास कसा होईल याकडे पालक म्हणून सातत्याने लक्ष केंद्रित करावं असं मला वाटतं,कारण आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मुलांची अवस्था ही कमी वेळेत अधिकाधिक यश संपादन करण्यावर असते मग त्यासाठी ते विविध मार्ग अवलंबतात कधी-कधी यश मिळते तर अनेकदा अपयशाला सामोरे जातात मग इथूनचं बऱ्याच समस्या आपल्या समोर उभ्या राहतात त्यामुळे पालकांनी जरा वेळ काढून आपल्या मुलांकडे लक्ष द्या आणि अजिबात दुर्लक्ष करू नका. मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका. आजच्या काळात जो शारीरिक व मानसिक आरोग्याने चांगला असेल तो भविष्याच्या दृष्टीने अधिकाधिक सक्षम असेल कारण आरोग्याने सुदृढ असलेला व्यक्ती हा शारीरिक व मानसिकदृष्ट्या न थकता विविध समस्यांना सहज सामोरे जात यशस्वी होत असतो,म्हणून आपल्या मुलांना दररोज एक तास मैदानावर पाठवा,त्याला आवडेल त्या खेळात सक्रिय राहु द्या,भरपुर खेळू द्या,कारण मैदानावर त्याच्या मुलभूत हालचाली होतात त्यामुळे शारीरिक विकास साधला जातो,विविध खेळ खेळण्यासाठी विविध कौशल्य असणं आवश्यक असतात आणि त्यासाठी ते नेहमीचं प्रयत्न करतात आणि यातूनच त्यांचा मानसिक विकास होत असतो, म्हणून आपल्या मुलांना किमान एक तास त्यांना मैदानावर त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी सक्रिय राहु द्या.



मुलांना आरामदायी जीवनशैलीकडून आनंददायी जीवनशैलीकडे नेण्याची गरज.* - आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आपल्याला काय हवं ते शरीराची हालचाल न होता जागच्या-जागी उपलब्ध होईल अशी व्यवस्था २१ व्या आधुनिक विज्ञान,तंत्रज्ञानाच्या युगात निर्माण झाली आहे,खरंतर विज्ञानाचे कौतुक केलं पाहिजे कारण विज्ञानामुळेचे मानवी समाजाची प्रगती होऊ शकली,विज्ञान नसते तर आपण आजही एकमेकांच्या संपर्कात आलो नसतो असो पण कुठंतरी आपण विज्ञानाचा गैरफायदा घेतोय की काय असं मला वाटतं,कारण मोबाईलमुळे बऱ्यापैकी शारीरिक हालचाली कमी झाल्या आणि शारीरिक व मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होत एकमेकांच्या सहवासात राहण्याची सवयी मागे पडल्या,मोबाईल मुळे आरामदायी जीवनशैलीची सवय अधिक लागली,आनंद व्यक्त करण्याचा मार्ग आपण विसरलो,अशा अनेक बाबी आहेत,त्यात मोटारसायकल,लिफ्ट,प्रत्यक्ष मैदानावर न खेळता,न अनुभव घेता मोबाईल, गेम झोन मध्ये घालवलेला वेळ अशा विविध बाजूंनी मुलांना आरामदायी जीवनशैलीची सवय लागत आहे, यापेक्षा त्यांना आनंदी वातावरणात आपण कसं नेऊ शकतो आणि त्यातुन त्यांना आनंददायी जीवनशैलीची सवय लागू शकते याचा विचार आपण करायला हवा. शाळेच्या नियमांचे पालन न करणे म्हणजे अधोगती कडे जाण्यासारखेच होय. शाळा म्हणजे मुलांच्या भविष्याला विकसित आकार देणारी शैक्षणिक गंगा प्रणाली होय, खरंतर असं म्हटलं तर अजिबात वावगं ठरणार नाही, कारण शालेय स्तरावर होणारा सर्वांगीण विकास हा मुलांना विविध क्षेत्रात यशस्वी बनवत असतो, म्हणून शाळेचं महत्त्व हे पालकांनी लक्षात घ्यावं,शाळेचे जे काही नियम अटी असतात ते मुलांच्या विकसित व सुदृढ भविष्यासाठीचं असतात हे लक्षात घेत मुलांना शाळेच्या नियमांचे पालन करतील यासाठी त्यांना प्रोत्साहन द्या, शाळेत वेळेवर येणं,गैरहजर न राहणे, गृहपाठ करणे,शिक्षकांचा आदर करणे,स्वच्छता,संघशक्ती व इतर काही नियमाचे पालन करणे अशा अनेक गोष्टींमुळे भविष्यात समाजामध्ये एक वेगळे स्थान मुलांचे निर्माण होते, उत्कृष्ट नागरिक म्हणून समाजात वावरू शकतो,व्यसनाकडे न जाता स्वतःचा विकास कसा होईल याकडे तो लक्ष केंद्रित करत असतो म्हणून पालकांनी शाळेला सहकार्य करणं आवश्यकचं आहे. आजच्या युगात अगदी लहानणापासूनच मुलांच्या हातात मोबाईल दिसतो आणि त्यांचे बऱ्यापैकी अतिशय घातक असे परिणाम आपल्या समोर दिसून आले आहेत,असो पण मैदानावर सक्रिय राहण्याच्या वयात जर ते सोशल मीडियावर अधिक सक्रिय राहत असतील तर आपण पालक म्हणून सातत्याने लक्ष केंद्रित केलं पाहिजे कारण याचे दुष्परिणाम हे त्यांचे भविष्य उध्वस्त करु शकते, म्हणुन आतापासून सावधगिरी आपण बाळगली पाहिजे,सोशल मीडिया मुळे होणारे संबंध, शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम अशा अनेक बाबी आहेत,शालेय स्तरावरील मुलांच्या हातात मोबाईल देण्यापेक्षा पुस्तक,खेळाची साहित्य किंवा त्यांना आनंददायी जीवनशैलीची सवयी लावणाऱ्या गोष्टी आपण दिल्या पाहिजे आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील पालक हा मुलांच्या भविष्याच्या सक्रिय असणं अतिआवश्यक आहे. बहुतेकदा आपण आपल्या कामानिमित्त मुलांना वेळ देत नाही,त्यांच्याशी मोकळ्यापणाने बोलत नाही अशा अनेक बाबीमुळे त्यांना एकटेपणाची जाणीव होते, मोबाईल हातात आल्यामुळे आजकाल मुलांचा मित्र परिवार हा कमी झाला आहे, मग अशा स्थितीत आपण मित्र म्हणून त्याच्याशी बोलायला हवं,त्यांना चांगल्या गोष्टीसाठी प्रोत्साहन द्यायला हवं,सुट्टीच्या दिवशी त्यांना शैक्षणिक, नैसर्गिक किंवा त्यांच्या आवडीच्या ठिकाणी घेवून जायला हवं त्यातून त्यांच्या मनातील नकारात्मक विचार हे बाजूला जातात आणि त्यातून तूम्ही सकारात्मक दृष्टिकोन प्रस्थापित करु शकतात,मुलांसोबत मैदानावर जा, खेळा,अवांतर विषयाशी संबंधित गप्पा गोष्टी करा, संस्कृती विषयी बोला, त्यातून मुलांना प्रेरणा मिळत असते.आजच्या मुलांची बौद्धिक पातळी ही अधिक विकसित दिसते,कारण याला बऱ्यापैकी आधुनिक विज्ञान,तंत्रज्ञान जवाबदार आहे,असो पण प्रत्येक मुलांकडे काहीना-काही कलागुण, क्रीडागुण असतात आणि ते आपण चांगल्यापैकी ओळखू शकतो, त्यामुळे त्यांच्यावर आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी लादणे हे त्यांच्या विकासासाठी सतत अपयशी ठरत असतात,त्यामुळे त्यांना काय आवडतं,त्याचा आनंद कोणत्या क्षेत्रात अधिक आहे हे आपण ओळखलं पाहिजे,यासाठी आपण शिक्षकांची मदत घेऊ शकतो, त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेऊ शकतो. मुलांचे उज्वल भविष्य त्यांच्या कलागुणांवर अवलंबून आहे आणि आपण त्यांच्या कलागुणाकडे अजिबात दुर्लक्ष करून चालणार नाही. पालक म्हणून आपण सातत्याने त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे लक्ष दिलं पाहिजे त्याचबरोबर मुलांच्या आवडी-निवडी आपण ओळखल्या पाहिजे,जेणेकरून ते भविष्यात यशस्वी होऊ शकतील, समाजात अभिमानाने वावरू शकतील.

# 'अर्ज' मधले दिवस



जयेश महादेव

आधुनिक केसरी

**अर्ज मधले दिवस" या डॉ.रुपेश पाटकर यांच्या पुस्तकाला नुकताच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सरस्वती लक्ष्मण पवार हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्या निमित्ताने..**

पुस्तक प्रकाशित व्हायच्या आधीच 'अर्ज' मधले दिवस या संपूर्ण पुस्तकाची PDF डॉ.रुपेश पाटकर यांनी मला पाठवली. मला खुपच आनंद झाला. प्रकाशित व्हायच्या आधीच मला पुस्तक वाचायला मिळाले आणि ते प्रत्यक्ष लेखकाने पाठवले. मला स्वतःचा अभिमान वाटला. खरं तर PDF पुस्तके मोबाईलवर वाचायला जड जातात म्हणून मी लॅपटॉप वर घेऊन सदर पुस्तक फक्त दोन बैठकीत वाचून काढले आणि काही वेळ स्तिमित झालो. कारण पुस्तकाचा विषयच असा होता.

आपल्याला रेडलाईट एरिया माहित आहे. जसा मुंबईत कामाठीपुरा,फारस रोड हा एरिया रेड लाईट म्हणून ओळखला जातो तसाच गोव्यातील 'बायना' हा परिसर रेड लाईट म्हणून ओळखला जातो. या परिसरात 'अर्ज' ही सेवाभावी संस्था वेश्या व्यवसायातील स्त्रियांना सन्मानाने जगायला शिकवते. त्यांच्या अडी अडचणीच्या वेळी धावून जाते. वेश्यांप्रती समाजाची असलेली भावना बदल्याण्याचे प्रयत्न करते. या संस्थेत डॉ.रूपेश यांनी काही काळ काम केले. त्या काळातील त्यांचे अनुभव आणि 'अर्ज' या संस्थेचे कार्य लेखकाने खुपच आत्मियतेने कथन केले आहेत. हे पुस्तक वाचताना एखाद्या सिनेमाची पटकथा तर वाचत नाही ना असे वाटत रहाते. एवढे ज्वलंत अनुभव आणि संस्थेचे कार्य आहे.

'बायना' ही वेश्यावस्ती गोवा सरकारने जमिनदोस्त केली पण सरकार वेश्या व्यवसाय उद्ध्वस्त करु शकले नाही. जो व्यवसाय एका जागी होत होता तो संपूर्ण गोवाभर पसरला फक्त त्याचे स्वरुप बदलले. व्यक्तीला किंवा वस्तीला उद्ध्वस्त करून मानसिकता बदलता येत नाही. हे लेखकाने प्रभावीपणे मांडले आहे.

'अर्ज' या संस्थेचे संस्थापक अरूण पांडे सर, झरीना दीदी आणि त्यांचे सहकारी हे अगदी निरपेक्ष बुद्धीने काम करतात. समाजातील मानसिकता बदलण्यासाठीचे त्यांचे सकारात्मक प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

'बायना' वस्तीमधील पोलिसांचे राउंड अप, तेथील वेश्या बाजार आणि त्यांचे आर्थिक हितसंबध यांचे गणित लेखकाने अगदी छान पद्धतीने उलगडवुन दाखवले आहे.

बायनातील पिडीत स्त्रियांची कोर्टातील पहिली लढाई खरोखरच मतीभेद करणारी होती. अन्याया विरोधात आपणही आवाज उठवू शकतो हा आत्मविश्वास तेथील पिडीत स्त्रियांना मिळाला होता खरंतर हा 'अर्ज' वरचा विश्वास होता. आपणासाठी आपल्यामागे कोणीतरी आहे हा विश्वास माणसाकडून खुप काही करवून घेतो. शिलाची गोष्ट मन अस्वस्थ करून सोडते. 'रंडिका बच्चा' म्हणून समाजाने हिणवणं ही ज्योतिबाची वेदना बघून मन कातरून जाते. संस्थेतल्या भीमाचे अनुभवाचे बोल खूप काही शिकवून जातात. "भीमा हा माझ्या मानसिकतेला समृद्ध करणारा साक्षात्कार आहे".असे लेखकाला उगाच नाही वाटत!

कोठेवालीकडून मुलीला एका मुलाने पळवून नेले असे भासवून त्या मुलाची पोलिसात तक्रार करणे, मुलाला पोलिसांनी पकडणे, त्याला मित्रांनी केलेली मदत, मुलीचा शोध, नाट्यमयरित्या मुलगी सापडणे, अजुन एका अल्पवयीन मुलीची सुटका... हे सगळं वाचत असताना आपण एखाद्या सिनेमाची पटकथा वाचतोय असे वाटत रहाते.

'अर्ज'या संस्थेचे कार्य सर्वांसमोर ठेवण्याचा लेखकाचा प्रामाणिक प्रयत्न आहे.





'अर्ज'ने सुरूवातीच्या काळात मुलांचे शिक्षक बनून काम करत 'बायना' वस्तीत प्रवेश मिळवला नंतर तरूणांशी जवळीक निर्माण करून तरूणांसोबत छोटे मोठे कार्यक्रम करून तरूणांमध्ये विश्वास निर्माण केला. अशाप्रकारे सकारात्मक वातावरण निर्माण झाल्यावर छोट्या छोट्या क्लबची निर्मिती करून विश्वासक वातावरण निर्माण करून वेश्या व्यवसायातील प्रत्यक्ष पिडीतां पर्यंत पोचून बाजारालाच आव्हान दिले. 'अर्ज'चा हा नियोजनबद्ध प्रवास अतिशय जाणीवपूर्वक शब्दबद्ध करण्यात लेखक कमालीचे यशस्वी झाले आहेत. गोव्यातील देवदासी प्रथे विरोधात केलेले कामही विशेष लक्षणीय आहे. वेश्यांना कोणी घरंदाज स्त्रियांचे चरित्र वाचवणाऱ्या म्हणून समाज रक्षक संबोधतात तर कोणी त्यांना 'सेक्स वर्कर्स' असे नाव देतो पण वेश्या या ना समाज रक्षक आहेत ना वर्कर्स (कामगार) त्या निव्वळ शोषिक आहेत. पिडीतां आहेत. हे लेखकाने अधोरेखित केले आहे.

बायनातील प्रत्येक स्त्रि ची एक स्वतंत्र कहाणी आहे, स्वतंत्र व्यथा आहे. जी आपल्या काळजाचा वेध घेते. आपल्यालाही विचार करायला प्रवृत्त करते. एवढ्या प्रभावीपणे लेखकाने आपले अनुभव मांडले आहेत.

30 जुलै हा 'मानवी तस्करी विरोधी दिन' आहे. या निमित्ताने 'अर्ज' मधले दिवस हे पुस्तक प्रकाशित होत आहे. 'अर्ज' या संस्थेचा उद्देश, कार्य आणि लेखकाचे या संस्थेत काम करण्याचे अनुभव मनाला स्पर्शून जातात. सदर पुस्तकावर पुढे जाऊन एखाला सिनेमा बनला तर आश्चर्य वाटण्या सारखे काहीच नाही.



पुस्तक परिक्षणः जयेश अ. माधव

पुस्तकाचे नावः 'अर्ज' मधले दिवस

लेखकः डॉ.रुपेश पाटकर( +91 96236 65321)

किंमतः100/-

# परतीचा प्रवास



आधुनिक केसरी

मनाची बंदिस्त कवाडं खोलून चौफेर सभोवताली नजर फिरवली, रविकिरणांनी चंदेरी झालर पांघरली तशी तिच्या हातातली दोन काकणं चकमक करू लागली. किरणांना धातूचा स्पर्श झाला की धातू आपला मूळ स्वरूप बदलतात, माणसांचंही काहीसं असंच, माणूस एखाद्या चकाकणाऱ्या वस्तूच्या संपर्कात आला की तो स्वतःचा मूळ स्वभाव विसरतो.

लाटांचं तरंगणं, पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहणं, प्रवाहात विरघळणं पुन्हा तरंगणं-वाहणं-विरघळणं, हे तोपर्यंत चालूच राहतं जोपर्यंत लाटांना किनारा सापडत नाही. पक्ष्यांची किलबिल धून मनात आशावाद जागवते, घरट्याकडे जाण्यासाठी त्याला खुणावते, स्वप्न दाखवते. मग सुरू होतो स्वप्नांचा खेळ. किरणं क्षितिजापाशी विसावतात आसरा शोधतात पण स्वप्न किनाऱ्यावर धाव घेते. जीवनाच्या सांजपटलावर घोळत बसलेली नाव एक ना एक दिवस किनाऱ्याला लागेल आणि स्वप्न सत्यात अवतरेल. असा हा आयुष्याच्या वाटेवरील परतीचा प्रवास स्वप्न, खगपंक्ती, लाटा, क्षितिज, सावल्या, रविकिरणं आणि सरतेशेवटी किनाऱ्यावर येऊन विसावा घेतो.

प्रदीप बडदे
संपर्क क्र. ९५९४०२७९९५

# क्रांतिज्योती सावित्रीमाई



बापू इवरे
संपर्क. 918408925299

आधुनिक केसरी

**किती भोगले-सोसले तरी स्त्रीयांना शिकविले  गिरविले धडे स्त्रीशिक्षणाचे भारतीय महिलांना आत्मबळ पुरवित स्त्री शिक्षणाचे आजीवन व्रत चालवणाऱ्या प्रथम महिला शिक्षिका सावित्रीबाई जोतीबा फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी झाला.हा दिवस बालिका दिन म्हणून साजरा केला जातो.बहुजन चळवळीचे आधारवड समाज सुधारक जोतीराव गोविंदराव फुले यांच्या त्या धर्मपत्नी होत्या. १८४० साली वडील खंडोजी नेवसे यांनी वयाच्या नवव्या वर्षी सावित्रीबाईंचा विवाह जोतीरावांशी लावला. त्यामुळे चळवळ करीत त्या वाढल्या.उत्तम कवयित्री, अध्यापिका आणि समाजसेविका असलेल्या सावित्रीमाईंनी आयुष्यभर विद्यार्जन करीत महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन दिली.**

वास्तविक महात्मा फुलेंनी त्यांना विवाहानंतर लिहायला-वाचायला शिकवले.त्याकाळी स्त्रीयांना शिक्षणाची अनुमती नव्हती. जुण्या विचारांचा पगडा असल्याने जोतीरावांच्या घरच्यांनी त्यांना या कारणामुळे घराबाहेर काढले.तरीही ते यत्किंचितही ढळले नाहीत. आपल्या पत्नीला त्यांनी क्रांतीज्योती केले. समाजाच्या तीव्र विरोधानंतरही सावित्रीमाईंचे शिक्षण सुरुच राहिले. या शिक्षणाचा उपयोग महिलांना व्हायला हवा म्हणून पुण्यातील भिडेवाड्यात १८४८साली मुलींची पहिली शाळा सुरु केली. सावित्रीमाईंनी एकूण नऊ मुलींचे शिक्षण सुरु केले. आणि त्या पहिल्या मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंवर बोलण्यातून आणि प्रत्यक्षपणे शेण, कचरा, दगड, चिखल फेकण्यात येवू लागले. पण आपल्या ध्येयापासून त्या ढळल्या नाहीत. आपल्या मनात त्यांनी स्त्रीशिक्षणाची ज्योत सदैव तेवत ठेवली. ध्येयापासून परावृत्त झाल्या नाहीत. त्यांनी स्त्रिशिक्षणाची ज्योत आपल्या मनात सदैव तेवत ठेवली. महिलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी सावित्रीबाईंनी जोतिरावांसोबत खांद्याला खांदा लावून कार्य केले. विधवा आणि गर्भवती महिलांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात त्यांनी बालहत्या प्रतिबंधगृह सुरु केले. समाजातील असमानता दूर करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांचे काम केवळ शिक्षणापुरते नव्हते. विधवा आणि मुलांच्या हत्या थांबवण्याठी आणि गरीब अस्पृश्य समाजासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा सन्मान १२ फेब्रुवारी १८५२ रोजी ब्रिटिश अधिकारी मेजर कँडी यांनी केला. सावित्रीबाईंनी स्त्रियांनाच



नव्हे तर पुरुषांनाही त्यांच्या जडत्वापासून मुक्त केले. त्यांचे पती जोतिराव फुले यांनी जगात सतत विकसीत होणाऱ्या आणि स्त्रीवादी विचारसरणीचा भक्कम पाया घातला होता. दोघेही ऑक्सफर्डकडे गेले नाहीत. परंतु त्यांनी भारतीय वाईट प्रथेला ओळखले आणि विरोध केला. येथे राहून त्यांनी लोकांना शिक्षण देत समस्यांचे निराकरण केले.

आजही आपला समाज जातिभेद, विषमता, अंधश्रद्धा, शोषण आदिंशी झगडत आहे. या सर्वांच्या विरोधात दिडशेवर्षांपूर्वी जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी बुलंद आवाज उठवला. होता. स्त्री शिक्षणातील त्यांचे योगदान मोठे होते.

महिलांवर अन्याय, अत्याचार व्हायचे. त्यांच्या विरोधात बोलणाऱ्यांविरुद्धही त्यांनी आवाज उठवला. त्यावेळी नाव्ह्यांचा संप अत्यंत उल्लेखनिय आंदोलनांपैकी एक ठरला. त्यांनी विधवांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठवला. स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी जीवाचे रान केले. या संपूर्ण प्रवासात जोतीराव फुले हे त्यांचे केवळ मार्गदर्शक नव्हते तर खंदे समर्थक होते.मूल झाले नाही म्हणून दुसरे लग्न तर केले नाहीच पण आयुष्यभर त्यांना साथ देणारे जोतिबा फुले युगरुपुष होते. त्यांच्या सहवासातच सावित्रीबाईंनी लेखनाला सुरुवात केली. पुढे कवयित्री म्हणून देखील त्या समाजात पुढे आल्या. 'काव्यफुले' आणि बावनकशी 'सुबोध रत्नाकर' या त्यांच्या काव्यरचना आजही आपण पाहू आणि अभ्यासू शकतो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आदर व्यक्त करताना सावित्रीबाई म्हणतात -


***छत्रपती शिवाजीचे***
***प्रात स्मरण करावे स्मरण***
***शुद्रादी अती शूद्रांचा प्रभू***
***वंदू मनोभावे***

१८९७ मध्ये प्लेगने पुण्याला घेरले. त्यामध्ये रुग्णांची सेवा करता असताना त्या या आजाराने ग्रस्त झाल्या. शेवटी १० मार्च १८९७ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेंचे निधन झाले. त्यांच्या अतूल्य योगदानाला कधीही विसरता येणार नाही. महिला शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांच्या कार्यामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र आणि केंद्र सरकारने त्यांच्या नावाने अनेक पुरस्कारांची निर्मिती केली. त्यांच्या सन्मानार्थ डाक तिकीट काढले. ३ जानेवारी हा दिवस आपण बालिका दिन म्हणून साजरा करतो. अलीकडे शाळा महाविद्यालयात सावित्रीमाईंचा फोटो लावण्यासंबंधी शासनाने परिपत्रक काढले.कविवर्य श्रावण गिरी आपल्या अंतरीचे धावे,या कविता संग्रहातील कवितेत सावित्रीमाईंविषयी म्हणतात

***सावित्री माय झाली***
***अनाथ अबलांची सावित्री माय झाली***
***चुकलेल्या वासरांची सावित्री गाय झाली ॥ धृ ॥***
***पिचलेल्या मणगटांची सावित्री शक्ती होती***
***दबलेल्या बहुजनांची सावित्री स्फूर्ती होती***
***पेटलेल्या जोतीची सावित्री ज्योत होती***
***अंधार छेदण्याचे सावित्री शस्त्र झाली ।। १ ॥***
***सोबती अक्षरांची सावित्री नित्य झाली***
***जागती ज्योतीवाणी सावित्री सत्य झाली***
***फुले सुगंधाची दरवळ सावित्री झाली***
***जोतीबा अंगणीची हिरवळ सावित्री झाली ।। २ ।।***
***सावित्री जागराचे दरबार सर्व भरले***
***नव्या जाणिवांचे नवे सावित्री पर्व आले***
***आजन्म तळपणारी सावित्री धन्य झाली***
***विद्येच्या दारी माझी सावित्री माय आली ।। ३ ।।***

थोर समाज सेविका सावित्रीबाई यांना विनम्र अभिवादन...

# राम माझा सखा : पुस्तक परिचय




आधुनिक केसरी

"सखा" म्हणजे जवळचा. आपल्या आजूबाजूला अनेक लोकांची गर्दी असते, पण ज्याच्या जवळ आपण आपलं मन मोकळं करू शकतो, ज्याला आपली सर्व सुखदुःखे सांगतो, ज्याच्या समोर आपल्या अश्रूंची वाट मोकळी होते ज्याला आपण न बोलताही आपल्या मनातलं समजतं असा एकमेव म्हणजे आपला सखा.

लेखक श्री स्वानंद नंदकुमार मराठे यांना प्रभू श्रीराम आपले सखा वाटतात. त्यामुळे त्यांनी रामाला दैवत, पिता, माऊली, पाठीराखा, आधार, आराध्य असे संबोधून शिवाय आपला सखा ही मानले आहे.

"राम माझा सखा" असे या पुस्तकाचे नाव असून यामध्ये ४ कविता, ५० श्लोक आणि त्याला अनुसरून असलेली रामाची प्रतिमा पाहून आपल्याला वेगळीच सकारात्मक ऊर्जा मिळते.


श्री संतवेण्णास्वामी मठ मिरज येथे ३० जानेवारी २०२१ रोजी कौस्तुभ बुवा रामदासी यांच्याकडून हे पुस्तक प्रकाशित झाले. सौ.स्वरांगी स्वानंद मराठे यांच्याकडे या पुस्तकाचे हक्क आहेत. लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच वाचण्यासाठी स्पष्ट आणि मोठ्या अक्षरात असलेल्या छपाईमुळे आपल्याला ते सहज वाचता येईल आणि प्रभू रामांची गोडी लावेल यात शंका नाही.

अल्प दर आणि लहान आकाराचे हे पुस्तक मनाला भावणारे असे आहे. पुस्तकावरील रामाचे छायाचित्र पाहून वाचण्याची इच्छा मनात निर्माण होते. तुम्हीही हे पुस्तक एकदा नक्की वाचा ते तुम्हाला उपलब्ध करण्यात येईल.

**- सौ . स्वरांगी स्वानंद मराठे**

# सुबोध सावजी नावाच्या वादळी नेतृत्वाचा वाढदिवस...

आधुनिक केसरी



सुबोध सावजी...राजकीय पटलावर गाजलेलं नांव. राजकारणातील लोकांवर टीका टिपणी होणारच,त्याला सुबोध सावजी हे नाव देखील अपवाद नाही. कुणी त्यांना गारुडी म्हणून ओळखतं, कुणी त्यांना डमरू म्हणतं, कुणी आंदोलनसम्राट म्हणत तर कुणी काहीही....मात्र मेहकर विधानसभा मतदारसंघाचा इतिहास जेव्हा लिहल्या जाईल तेव्हा सुबोध सावजी या नावाशिवाय हा इतिहास पुढे जाऊ शकणार नाही हे तितकेच खरे ! सुबोध सावजी हा माझा पत्रकारितेतील आवडता विषय.
सुबोध सावजी यांच्या राजकारणातील अनेक प्रयोगाबद्दल मी टीकात्मक खूप लिहल. मग ग्रामपंचायत निवडणुकी वेळी त्यांची फाशी घेण्याची घोषणा असेल, लोकसभा निवडणुकीच्या वेळीची फाशीची घोषणा असेल,त्यांची हवाई सफरी चि चारधाम यात्रा असेल, ह्या विषयावर मी खूप लिहले. सडकून टीका ही केली.मग चिडून जात सावजीनी माझ्या विरुद्ध गलिच्छ भाषेत पत्रक गावभर वाटले देखील.मात्र वाचकांसाठी- समाजासाठी जे आवश्यक आहे,ते निर्भीडपणे आणि ते देखील राजकारणात दरारा असणाऱ्या सुबोध सावजी नावाच्या वादळाविरुद्ध न डगमगता मी बेडरपणे लिहले. मात्र यासोबत मध्यरात्री मेहकर शहरातून त्यांनी काढलेली फेरी व नंतर घेतलेली सभा असेल, कोरोनाच्या काळात प्रशासनाच्या सरंजामशाही निर्णयाचा सावजीनी विरोध केला तर तो देखील मी लिहला तर आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला त्यांनी केवळ मेहकर मतदारसंघापूरती मदत न करता संपूर्ण जिल्हाभर केलेली मदत,त्याबद्दल लिहतांना देखील मी कधी हात आखडता घेतला नाही. सुबोध सावजी यांच्या राजकारणाचे विविध पैलू असतीलही आणि आहेत देखील. मात्र राजकारणात आणि राजकीय लोकांमध्ये न दिसणारे गुण देखील त्यांच्यात दडलेले आहेत. माणूस हा सद्‌गुण आणि दुर्गुणाचा पुतळा असतो. त्याला कुणीही अपवाद नसते. मात्र माणसाला माणूसपण जपता येणं महत्वाचे असते आणि ते माणूसपण जपण्याचा त्यांचा स्वभाव त्यांच्यावर लिहायला भाग पाडतो. सुबोधभाऊ सावजी परिवाराचे व माझे कौटुंबिक ऋणानुबंध. पत्रकारिता आणि व्यक्तिगत संबंध याची मी कधी सरमिसळ होऊ देत नाही आणि माझ्या पत्रकारितेचा वैयक्तिक संबंधावर कधी परिणाम होऊ देत नाही. आपला पेशा-आपले कर्तव्य आणि व्यक्तिगत ऋणानुबंध वेगळे आहेत.
त्यात पूर्वग्रहदूषित पणा येणार नाही याची काळजी घेत असल्याने मी आजपर्यंत माझ्या स्थानावर टिकून आहे. सुबोध सावजीनी माझ्याविरुद्ध गलिच्छ व शिवराळ भाषेत पत्रक काढले याचा आकस कधी मी धरला नाही आणि मी त्यांच्या विरुद्ध लिहले म्हणून त्यांनी कधी सुडबुद्धि ठेवली नाही. त्यामुळेच कुठलेही आंदोलन करण्यापूर्वी ते अनेकांशी त्याबाबत चर्चा करत असतात. त्या यादीत माझे देखील नाव आहे. मी वर्षातून किमान एक दोन वेळा त्यांच्याकडे सहपरिवार स्नेह भोजनासाठी असतो. अर्थात त्यांच्या स्नुषा आणि श्री शैलेश सावजी यांच्या पत्नी माजी सभापती सौ सायली ताई आणि माझे बहीण भावाचे नाते. याच नात्याच्या धाग्याने आमचे ऋणानुबंध घट्ट झालेले. मी जेव्हा जेव्हा त्यांच्या घरी जातो,त्या त्या वेळी आमच्या गप्पांचा विषय कौटुंबिक च असतो.चुकूनही राजकारणावर आमची चर्चा होत नाही.

त्यावेळी असतात कौटुंबिक गप्पा. आणि आदर सत्कार.

त्यावेळी त्यांच्यासाठी मी पत्रकार नसतो तर असतो त्यांच्या सुनेचा भाऊ. ही असली नाती देखील जपण्याचे काम हा परिवार करतो. सर्वधर्म समभाव हा विचारपीठावरून बोलण्यापुरती राजकीय मंडळी मी बघत आलो.मात्र सावजी याला अपवाद आहेत. स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचे लग्न सर्व धर्माच्या रितीरिवाज प्रमाणे लावण्याचे धरिष्टय केवळ सुबोध सावजी सारखाच माणूस करू शकतो. मग त्या लग्नपीठावर असतात पुजारी,ब्राम्हण,भन्ते, मौलाना, फादर... आईचा मरणाचा सोहळा कुणाचीही भीडभाड न बाळगता शाही करतात ते केवळ सुबोध सावजीच !
जीन ऐश्वर्य बघितले आणि तशा पद्धतीचे सुखी संपन्न आयुष्य जगले तिला थाटात,वाजत गाजत निरोप द्यावा तो सावजीनीच !
तिचा सर्वधर्मीय अंत्यसंस्कार करावा तो देखील सावजीनीच.
आणि हा वाढदिवस सोहळा देखील त्याच पद्धतीने साजरा करण्याचा घाट सावजीनी घातला तो त्यांच्या ह्या स्वभावातूनच.
बोलणे आणि कृतीत आणणे यात खूप अंतर असते.
मात्र जगणं आणि वागणं याचा मेळ घालण्याचे तंत्र सुबोध सावजी यांना चांगलेच गावले आहे. गतवर्षी वाढदिवस भव्यदिव्य साजरा केल्या जाणार होता.त्याची जय्यत तयारी देखील करण्यात आली होती. मात्र कोरोनाचे सावट आल्याने सोहळा झाला नाही पण या निमित्ताने काढण्यात आलेली स्मरणिका सर्वांपर्यंत पोहचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.
यावर्षी समाजप्रबोधनकार सप्तखंजेरी वादक सत्यपाल महाराज यांचे कीर्तन,औरंगाबाद येथील कुणाल वाराळे यांचे गायन,4 जानेवारी ला मुक्ताई महाराज चाळक,व शिवाणी महाराज चाळक यांचे कीर्तन, 5 जानेवारी ला लुकमान ताज व गुलणार निजामी यांचा कव्वाली चा मुकाबला,व 6 जानेवारी ला शिवलीला ताई पाटील यांच्या किर्तनाने वाढदिवस सोहळ्याची सांगता होणार आहे. वाढदिवस सोहळा देखील सर्वधर्मीय होणार आहे.
अतिशय अल्प समाज असलेल्या सावजी समाजातील या माणसाने 11 वर्ष वादळी राजकारण केले.
ते किती योग्य आणि किती चूक याचा लेखाजोगा आज मी घेणार नाही.मात्र ह्या वादळाने एक काळ गाजवला. हे वादळ आज शांत वाटत असेल पण अजूनही तीच ऊर्जा, तोच जोश कायम आहे हे महत्त्वाचे.
अशा वादळी नेतृत्वाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

**-सिद्धेश्वर राना पवार**
**गोडवा, बालाजी नगर, मेहकर**
**9422880080 / 7350473030**

# नांदेडचे शासकीय आयुर्वेद रुग्णालय ठरतेय रुग्णांसाठी नवसंजीवनी



कॉ. जामकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**" करम किये जा फल कि इच्छा मत कर अै इन्सान जैसे करम करेगा वैसे फल मिलेगा अै इन्सान" मित्रहो माझा आणि नांदेडच्या आयुर्वेद रुग्णालयाचा नेहमीच जवळचा संबंध राहिले आहे. कधी रुग्ण म्हणून तर कधी इतर रुग्णांच्या सहाय्यतेसाठी तर कधी कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या माध्यमातुन साधारणत: 1968 साली मी नुकताच महाविद्यालयीन शिक्षणासाठी नांदेडला आलो मला नांदेडचे काहीच माहित नव्हते त्या काळात आजच्या एवढे नांदेड विस्तारलेले नसल्यामुळे आम्ही होळीवर रहात असत. माझ्या आईला काविळ होवून तो पोटात उतरला व तीची प्रकृती खुप खालावल्यामुळे त्याकाळी डॉक्टरांच्या सल्ल्याने तीला हबीब टॉकीजजवळ असलेल्या आयुर्वेदिक रुग्णालयात दाखल केले होते. आजार खुप वाढलेला असल्यामुळे ती त्यातच दगावली हे सर्व चित्र मी प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितले. आई रुग्णालयातच गेल्यामुळे सारखे-सारखे तेच तेच चित्र माझ्या डोळ्यासमोर उभे रहात असल्यामुळे मला रुग्णालयात जाण्याचा अतिशय तिटकारा येतो. शेवटी भोग असल्यामुळे तो प्रत्येकाला भोगावाच लागतो. मी नशीब म्हणत नाही, त्यासाठी कायम निरोगी राहुन जिवन कसे जगता येईल याचा प्रत्येकाने विचार करावा असे वाटते. शेवटी "आलिया भोगाशी असावे सादर" उक्तीप्रमाणे होणार.**

पण भोग सुद्धा विचारपुर्वक वागल्यास टाळता येतो यावर माझा ठाम विश्वास आहे. तद्नंतरची दुसरी घटना माझा मुलगा आठ वर्षाचा असताना त्याला नेहमी टॉन्सीलचा त्रास होवुन नेहमीच रुग्णालयात जावे लागे. 1994 च्या आसपास मी त्याला ॲलोपॅथीची ट्रिटमेंट सोडुन आपल्या आयुर्वेदिक रुग्णालयातील जेष्ठ वैद्य वंजारी सरांकडे दाखवून विना-कुठलीही शस्त्रक्रिया न करता त्यांच्या मार्गदर्शन व सल्ल्याने केवळ द्राक्षगंधा व टॅन्सीनो ही औषधी वर्षभर देवून तो आजार बरा झाला शिवाय शस्त्रक्रियेचा खर्चही वाचला. हे सर्व मी का करु शकलो तर डॉक्टरांनी दिलेला प्रामाणिक सल्ला व मार्गदर्शनासहित त्यांची रुग्णाविषयीची आस्था व माझा डॉक्टरप्रती दृढ असलेला विश्वास. वर्तमानात अशी विश्वासार्हता डॉक्टर व रुग्णामध्ये अभावानेच दिसते कारण वर्तमानात वैद्यकीय सेवा ही सेवा राहिली नाही मग ती खाजगीतली असो किंवा सरकारी हे आपण सर्वत्र बघत आहोत. आजची वैद्यकिय सेवा ही व्यावसायीक झाली आहे असे म्हणावयास हरकत नसावी त्याच्या कारण मिमांसेच्या खोलात मी जात नाही. पण आपल्या नांदेडचे आयुर्वेद रुग्णालय व तेथे कार्यरत असणारे सर्वच कर्मचारी नक्कीच या विषयाला अपवाद जरुर आहेत. वर्तमानात कुठलीही शासकिय सेवा ही सशुल्क असो अथवा निशुल्क ती सेवाच असावी तीचे रुपांतर व्यावसायीकतेत व भ्रष्टाचारात नसावे. असे सर्व सामान्याला प्रामाणिकपणे अपेक्षित आहे. आयुर्वेद उपचार पद्धती ही ॲलोपॅथीसारखी तात्काळ आराम देणारी नसली तरी यथावकाश त्यात नक्किच सकारात्मक परिणाम दिसुन येतात. शिवाय अशा उपचार सेवनात इतर साईड इफेक्ट नसतात पण यातील अेक महत्त्वाची बाब म्हणजे कुठल्याही आजाराचे अचुक निदान आधी होणे फार महत्वाचे असुन त्याची दुसरी बाजू ही रुग्णाची मानसिकता सुदृढ करुन सुरु केलेली औषधोपचार पद्धती रुग्णासाठी अधिक फायदेशिर ठरु शकते, माझ्या मते अजून अेक बाब याहीपेक्षा महत्वाची आहे ती म्हणजे डॉक्टर व रुग्णामधिल आस्था व आपुलीकचे नाते जे आज अपवादाने आढळते. रुग्ण व वैद्यामधील हे नातेसंबंध डॉक्टरांच्या व्यवसायीकतेमूळे अधिकच दुरावत आहेत. अशा सर्व बाबी टाळुन रुग्ण व डॉक्टरामधील आपूलकीचे नाते जपण्याचा सर्वंकश प्रयत्न आयुर्वेद रुग्णालयातील डॉक्टर व सर्व कर्मचाऱ्यांकडुन अतिशय प्रामाणिक, आपूलकी व सेवाभावी वृत्तीने जपल्या जात असल्याचा प्रथमदर्शनी वास्तव पुरावा म्हणुन मी खुद्द त्याचा साक्षीदार म्हणुन अनुभवलेला आहे व इतर रुग्णाकडुन ही प्रत्यक्षदर्शनी मी जाणून घेतले आहे. आयुर्वेद रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना आपूलकी व प्रेमाची वागणूक देवून त्यांचा आजार लवकरात लवकर कसा बरा करता येईल याचा सर्वतोपरी प्रयत्न आपल्या नांदेडच्या शासकीय आयुर्वेद रुग्णालयातील सर्वच कर्मचारी वर्गाकडुन सातत्याने नेहमीच चालु आहे. हे सर्व सुव्यवस्थित करण्यासाठी व होण्यासाठी रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टरांसह प्रशासकिय यंत्रणा अगदी नेहमी तयार असतात. मला असे वाटते हे सर्व साध्य करुन घेण्यासाठी वरिष्ठाकडुन




नियोजनबद्ध व प्रामाणिक नियोजनपूर्वक काम करवून घेतले जाते जी फार मोठी उपलबद्धीच म्हणावी लागेल. थोडक्यात असेही म्हणतात येईल की ज्या कुटुंबात आई-वडिल सुसंस्कारीक, प्रामाणिक,कष्टाळू व संवेदनशील असतात ते कुटुंब नक्किच कौतुकास पात्र असते नेमके हेच चित्र सध्या नांदेडच्या आयुर्वेद रुग्णालयात मी सातत्यपूर्वक बघत आहे. उगीच कुणाचेही कौतुक करुन पाठ थोपटण्याचे काम मी करत नाही कारण माझी लेखणी नेहमीच समाजातील वास्तव प्रखरतेने आम जनतेसमोर ठेवण्याचे काम करत असते.

अनादी काळापासून आपल्या देशात जडी-बुटीचा( वनस्पती औषधी ) वापर असुन बहुतांश जडीबुटी-झाडपाले औषधी आरोग्यासाठी अपायकारक नसल्यामुळे आजही ग्रामीण व शहरी भागत बहुतांश अशिक्षित-सुशिक्षित लोक जडीबुटीचा वापर करुन औषधोपचार करुन घेतात पण अशा पद्धतीचा अवलंब करत असताना कोणती वनस्पती अथवा जडीबुटी कुठे वापरावी याचे परिपूर्ण ज्ञान असणेही महत्त्वाचे आहे. अशा प्रकारच्या वनस्पती झाडपाल्यापासुन निर्माण झलेली औषधी म्हणजे आयुर्वेदिक औषधी असे समजण्यास हरकत नसावी. 1956 साली नांदेड स्थित आयुर्वेद रुग्णालयाची सुरुवात झाली अेकंदरीत उस्मानाबादसह उर्वरित महाराष्ट्रात पाच ठिकाणी आयुर्वेद रुग्णालय कार्यरत असून नांदेड स्थित रुग्णालयात अधुनिकरित्या शल्य-सर्जरी, शलाकाय-ENT,प्रसूती,स्त्रिरोग,बालरोग,काय चिकिस्ता-मेडिसिन,पॅथालॉजी, स्वास्थ रक्षण, योगा तथा निसर्गोपचार, पंचकर्म, एक्सरे, रक्त तपासणी या विभागासह येथील रसशाळेतून सध्या वेगवेगळी चुर्ण व गोळ्या तयार करुन रुग्णाना नेहमीच मोफत वाटप केल्या जातात. वर्तमानात प्रदिर्घ काळापसून शासनाने वर्ग तीन व चार च्या कर्मचाऱ्यांची सेवाभर्ती बंद केल्यामुळे आहे त्या स्थितीतील उपलब्ध कर्मचाऱ्याकडून रुग्णालयाची स्वच्छता केली जाते पण स्वच्छतेचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. भविष्यात रुग्णालय स्वच्छतेबाबत कंत्राटी धोरणाचा अवलंब होणार आहे हे निश्चितच. जवळपास सर्वच अजारावर येथे औषधोपचार केले जातात कारण सावकाश का होईना आयुर्वेदीय औषधोपचारामुळे रोगाचा समुळ नाश होतो हे सर्वसामान्य जाणून आहेत. हायड्रोसिल,हर्निया,ॲपेनडिक्स व इतरही आजारावर येथे शस्त्रक्रिया केल्या जातात. पक्षावध, सांधेदुखी,भंगदर,मूळव्याध सारख्या जूनाट आजारावरही येथे कायमस्वरुपी उपचार होतात. येथे बाह्य व आंतर रुग्णसोईसह ICTC लॅब व मॉड्युलर अत्याधुनिक ऑपरेशन थियेटर कार्यरत असून 230 उपलब्ध खाटासह गरीब, श्रीमंत असे दररोज सहाशे रुग्ण अशा सेवेचा लाभ घेतात.

# संतकवी चोखा मेळा

आधुनिक केसरी

**साधारण तेराव्या शतकात महाराष्ट्रात जी संत चळवळ उदयाला आली, त्या संतमेळ्यातील वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संतकवी चोखा मेळा होते. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील मंगळवेढा या लहानशा गावी एक गरीब महार कुटुंबात त्यांचा जन्म झाला. जन्माने शुद्र असले तरी शुद्ध कर्म, निर्मळ विचार, रसाळ वाणी, संवेदनक्षम मन व नितांत विठ्ठलभक्ती यामुळे ते संतपदापर्यंत पोहोचले. संत म्हणजे ज्याचे आचार, विचार, कर्म शुद्ध असतात तो.**

चोखोबांच्या वाट्याला आलेली हीनता, आजूबाजूची परिस्थिती, भौतिक व्यवहार, समाजात बोकाळलेली उच्चनीचता यामुळे त्यांच्या मनात आक्रंदन चालले होते. या आक्रंदनातूनच त्यांचे अभंग जन्माला आले. त्यांनी लिहिलेले ३५० अभंग वाचले की त्यांच्या आयुष्याचा जीवनपट उलगडत जातो. विश्वात्मकाचा साक्षात्कार प्रकट करणारी त्यांची वाणी होती. चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ होते. पोटासाठी त्यांना मोलमजुरी करावी लागे.

खालच्या कुळात जन्माला आल्यामुळे मिळेल ते उष्टं खरकटं खाऊन जीवन जगावं लागत असे. त्यांच्या जातीच्या बांधवांना मिळणारी हीनदीन वागणूक पाहून ते विठ्ठलाशी मूक संवाद करू लागले, “ हे विठ्ठला, सर्व तुझीच मुले आहेत ना ? मग आमच्याच वाट्याला हे भोग का ?” त्यांच्या मनातल्या वणव्यातून प्रकट झालेला हा अभंग पाहा – जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ।

*बहु भुकेला झालो । तुमच्या उष्ट्यासाठी आलो ।*
*बहु केली आस । तुमच्या दासांचा मी दास ।*
*चोखा म्हणे पाटी । आणिली तुमच्या उष्ट्यासाठी ।।*

संत चोखोबाविषयी संत बंका यांनी केलेलं वर्णन किती परिपूर्ण आहे पहा

*चोखा चोखट निर्मळ । तया अंगी नाही मळ*
*चोखा प्रेमाचा सागर । चोखा भक्तीचा आगर*
*चोखा प्रेमाची माउली । चोखा कृपेची साउली*

वरील अभंगातून चोखोबाच्या आंतरिक गुणांचा ठेवा प्रत्ययाला येतो. चोखोबा मनाने निर्मळ होते, त्यामुळे त्यांच्या अंगी जराही मळ नव्हता. अंतर्बाह्य निर्मळ असलेला हा संत प्रेमाची माउली आणि कृपेची सावली झाला. चोखोबाला प्रेमाचा सागर आणि भक्तीचे आगर असे संबोधण्यात आलं आहे. एवढंच नाही तर संत नामदेव चोखोबाविषयी म्हणतात –

*चोखा माझा जीव । चोखा माझा भाव ।*
*कुलधर्म देव चोखा माझा ।।*
*काय त्याची शक्ती ।*
*मोही आले व्यक्ती तयासाठी ।।*
*माझ्या चोखियाचे करिती जे ध्यान ।*
*तया कधी विघ्न पडो नही ।*

हा अभंग आजही जनसमाजात सुपरिचित आहे. वरील अभंगातून चोखोबा किती श्रेष्ठ होते हे आपल्या लक्षात येते. दैवी गुणांनी परिपूर्ण असलेल्या चोखोबाचे फक्त ध्यान केल्याने इतरांची संकटं दूर होतील असं नामदेव म्हणतात.

त्यांचा रात्रंदिवस विठ्ठलाबरोबर चाललेला मूक संवाद त्यांच्या अभंगातून ठायी ठायी आपल्या प्रत्ययाला येतो. ते म्हणतात, “ मी



एक महार आहे हे मला मान्य आहे, तरीही मी तुझा भक्त आहे. माझं तनमन मी तुला अर्पण केलं आहे, तेव्हा मी तुझाच झालो आहे. तुझं खरकटं खायलाही मी तयार आहे; पण ही हीनत्वाची वागणूक मला आता सहन होत नाही. अरे विठ्ठला, तुला माझी जराही दया येत नाही का ? माझा काय दोष आहे ते तरी सांग ?

*धाव घेई विठू आता । चालू नको मंद मंद*
*बडवे मज मारिती । ऐसे काहीतरी अपराध ? ।।*

अनेक प्रश्न मनात निर्माण झाले की चाखोबा व्यथित होतात. मनाच्या खोल काळजाच्या गाभ्यापासून मारलेली हाक विठ्ठलाच्या काळजाला भिडल्यावाचून कशी राहील ?

चाखोबांना भोगावं लागलेलं दुःख, वेदना, मानसिक छळ, अस्पृश्य म्हणून त्यांची केलेली उपेक्षा त्यांच्या अभंगांतून पदोपदी दिसून येते. भक्तिमार्गाचा संदेश त्यांनी त्यांच्या दलित बांधवांना दिला. “भक्तिमार्गाचा अवलंब करा. भक्तिरस प्राशन करा. आषाढी कार्तिकीला चंद्रभागेच्या तीरावर जो संताचा मेळा भरतो, त्यामध्ये सामील व्हा. चंद्रभागेत आंघोळ करून भक्तीची पताका हातात घ्या. विठ्ठलनामस्मरणाने स्वतःला शुद्ध करा.” अशी ते दवंडी पिटवतात.

समाजामध्ये असलेली वर्णव्यवस्था, परंपरेने लादलेल्या वाईट चालीरीती, त्यामुळे तळागाळातील समाजाच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले होते, ते कोणाला सांगणार आणि त्यांचं ऐकणार तरी कोण ?

चोखोबांच्या अभंगांतून आतल्या आत चाललेली घुसमट, पदोपदी दिसून येते. प्रापचिक दैन्य, दारिद्र्य तर आपल्या पाचवीलाच पूजले आहे. या सर्वांतून हा जीव मूक्त करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे भक्ती. हे ते जाणत होते. चोखोबा रात्रंदिवस आत्मशोध घेऊ लागले. त्या शोधातून अभंग जन्माला आले. त्यांचे सुप्रसिद्ध अभंग अनेक आहेत त्यापैकीच एक.

*ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा ।*
*काय भुललासी वरलिया रंगा ।*
*चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा ।।*

या अभंगातून ते सांगण्याचा प्रयत्न करतात की, “मी जरी जातीने शूद्र असलो तरी माझ्या ठिकाणी असलेली भक्ती पवित्र आहे. ऊस वाकडा जरी असला तरी त्याच्यामध्ये जो रस असतो, तो गोडच असतो. तशी माझी भक्ती आहे. कोणत्या जातीत जन्माला यावे हे आपल्या हातात नाही; परंतु चांगले कर्म करून मन पवित्र करणे हे तर आपल्या हातात आहे.

साधी सरळ शब्दरचना, मधुर वाणी, पवित्र मन आणि नितांत भक्ती यामुळे चोखोबांचे अभंग पाहता पाहता समाजात रुजले. खालील अभंगात किती खरेपणा आहे पहा –

*आम्हां न कळे ज्ञान, न कळे पुराण ।*
*वेदांचे वचन, कळे न आम्हां ।*
*चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा ।*
*गाईन केशवा नाव तुझे ।।*

आम्हाला वेद पुराणाचे अर्थ समजत नाहीत, कारण आम्ही पंडित नाही; परंतु हे केशवा, माझा भोळा भाव तू जाणतो आहेस. किती सहजता त्यांच्या अभंगातून आपल्या प्रत्ययाला येते. ते स्वतःला विठ्ठलाचा बलुतेदार समजतात. ते त्वेषाने म्हणतात

*जन्माला विटाळ, मरता विटाळ ।*
*चोखा म्हणे विटाळ आदिअंती ।*
*आदिअंती अवघा विटाळ सायला ।*
*सोहळा तो झाला कोणा न कळे ।।*
*चोखा म्हणे मज नवल वाटते !*
*विटाळापरते आहे कोणा ।।*

वरील रचनेतून मायबाप विठ्ठलाला ते म्हणतात, “हे विठ्ठला, माझ्या देवा, मला सांगा आमचा हा विटाळ कधी संपेल ?” म्हणजे याचा अर्थ आहे की, समाजातील जातिव्यवस्था कधी बदलेल ? या समाजात जन्माला आलो तेव्हापासून मी अस्पृश्य ठरलो व मरतानाही हा विटाळ घेऊनच मरणार का ?” आत्मउद्धार करण्याचा मार्ग आपल्यासाठी फक्त भक्तिमार्गच आहे ते त्यांनी पदोपदी त्यांच्या उपेक्षित बांधवांना सांगितले. भक्तिमार्गाचा संदेश सोप्या साध्या शब्दांत सर्वांना समजेल, उमजेल अशा रसाळ शब्दांत त्यांनी इतरांना समजावून सांगितला, त्यामुळे वैचारिक बदल घडवून आणण्याचे खूप मोठे काम चोखोबांनी केले.

*हरिकिर्तनाचे दाटी । तेथे चोखा घाली मिठी ।।*

असं त्यांच्याविषयी म्हटलं जातं. जिथे सत्संग असतो, परमेश्वराचे नामस्मरण होते, तेथे चोखोबाचे अस्तित्व जाणवते.

# वजन वाढवण्यासाठी काही प्रभावी उपाय

आधुनिक केसरी

वजन वाढवण्यासाठी पौष्टिक आहार महत्त्वाचा आहे. पण जर पचन शक्ती कमजोर असेलतर मग आहार पचत नाही. तेव्हा आधी काही चांगली आयुर्वेद चिकित्सा घेऊन मगच हेवि आहार घ्यावा.

१) सकाळी रिकाम्या पोटी तुळशीचि ४ पाने चावून खावी. व मग पाण्याने चूळ भरून घ्या.

२) जेवणाच्या अर्धा तास आधि अर्ध्या सुपारी एवढा आल्याचा तुकडा मीठ लावून चावून खावा.

३) जेवणाआधी हिंगाष्टक चूर्ण घ्यावे....

सकाळी व्यायाम केला कि, मूठभर शेंगदाणे व सुपारिएवढा गूळ एकत्र करून खावे किंवा शेंगदाण्याचे लाडू खा.

मूठभर तीळ भिजवून वाटा त्यात कपभर पाणी घालून यांचे गाळुन दूध काढून त्यात थोडे गुळ घालून घ्यावे. किंवा रोज एक मूठभर पांढरे तीळ खावे. कोमट पाण्यात ३ चमचे साल असलेले उडिद किंवा उडदाची डाळ भिजत ठेवून ३ तासांनी हे उडीद व वाटिभर खोबरे मिक्सरमध्ये वाटून याचा रस काढून मग यात गूळ मिसळून घ्यावे. याने वेगाने वजन वाढेल. पोळी करताना कणकेत दहावा भाग उडिद पिठ मिसळून ही पोळी तुप, किंवा ताकात कुस्करून खा. उन्हाळ्यात भरपूर आंबे दूधासोबत खावे. याने वजन वाढेल. दह्याचे भरपूर फायदे आहेत. यात वसा, मेद , प्रोटीन आहे. वजन वाढवण्यासाठी पौष्टिक आहे. जेवणात कोशिंबीर, सलाड, या रूपाने घ्या. रोज दोन वेळा लोणी साखर खा, पनीरचे पदार्थ खावेत. दलिया.. म्हणजे गव्हाचि सोजि हेल्दि आहे. हि तुपावर परतून मग शिजवून खा.सोबत गुळाचा खडा खावा. वजन वाढते. अश्वगंधा हा आयुर्वेदिक पर्याय आहे. एक ग्लास दूधामध्ये २ चमचे अश्वगंधा चूर्ण मिसळून पिल्यास दोन महिन्यांत भरपूर वजन वाढेल. वजन वाढवण्यासाठी उकडलेला बटाटा फायदेशीर आहे, उकडून सैंधव मीठ शिंपडून खावे. केळ्याने वजन लवकर वाढते. रोज सकाळी दोन केळी खावी काळे चणे वजन वाढवण्यासाठी मदत करतात. चण्यांमद्ये प्रोटीन्स असतात. रोज रात्री थोडे काळे चणे भिजवून सकाळी उठल्यावर याचे सेवन केल्याने वजन वाढेल. चण्यासोबत खजुर खाल्ल्यास फायदा होतो. दूधात खजुर उकळून ते दूध प्यावे. वजन वाढेल. मनुका रात्री भिजवून सकाळी खाल्ल्यास दोन महिन्यांत भरपूर वजन वाढेल. जेवणात तुप भरपूर प्रमाणात खावे, आणि झोपदेखील किमान आठ तास घ्यावी. सूर्य नमस्कार करावे, प्राणायाम नित्यनेमाने करावा, फिरायला जावे, वरील सर्व प्रकारचे उपाय करावेत. याने नक्कीच वजन वाढेल...

# बॉक्स ऑफिसला लागले 'वेड'! वीकेंडच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांमध्ये समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता रितेश देशमुख आणि त्याची पत्नी अभिनेत्री जिनिलिया देशमुखचा 'वेड' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. रितेशचा दिग्दर्शक म्हणून हा पहिलाच चित्रपट आहे. तर जिनिलियाने देखील या चित्रपटाच्या माध्यमातून मराठी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले आहे. आता या चित्रपटाने प्रदर्शनाच्या तीन दिवसातच बॉक्स ऑफिसला वेड लावले आहे. विकेंडला सर्वाधिक कमाई करणाऱ्या मराठी चित्रपटांच्या यादीमध्ये त्याचा सहभाग झाला आहे.

वेड हा चित्रपट शुक्रवारी ३० डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला. चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी २.२५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्यानंतर विकेंडला चित्रपटाच्या कमाईत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात होती. चित्रटाने शनिवारी ३.२५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. तर रविवारी चित्रपटाने ४. ५० कोटींचा गल्ला जमावला. प्रदर्शनाच्या तीन दिवसात चित्रपटाने १० कोटी रुपयांची कमाई केली आहे.

वेड या चित्रपटाने आणखी एक रेकॉर्ड केला आहे. आजवर प्रदर्शित झालेल्या मराठी चित्रपटांमध्ये विकेंडला सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीमध्ये या चित्रपटाचा समावेश झाला आहे. हा चित्रपट पाचव्या क्रमांकावर आहे. सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीमध्ये पहिल्या क्रमांकावर सैराट आहे. या चित्रपटाने १२.१० कोटी कमावले होते. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर टाइमपास २ आहे. या चित्रपटाने ११ कोटींचा गल्ला जमावला होता. नटसम्राट हा चित्रपट तिसऱ्या क्रमांकावर आहे. या चित्रपटाने १०.२५ कोटी रुपये कमावले होते. त्यानंतर रितेशचा लय भारी चित्रपट आहे. या चित्रपटाने १०.५५ कोटी कमावले होते. आता १० कोटी कमावत वेड चित्रपट या यादीमध्ये सहभागी झाला आहे. वेड या चित्रपटात जिनिलिया आणि रितेश सोबत ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, विद्याधर जोशी, जिया शंकर, शुभंकर तवडे हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. तसेच बॉलिवूडचा भाईजान सलमान खानहा एका गाण्यात पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसत आहे.




# नंदुरबार पोलिसांनी दिली निराधारांना माणुसकीची ऊब

आधुनिक केसरी न्यूज



**नंदुरबार :** नंदुरबार पोलीस नेहमी उपक्रम राबवत असते. सगळी कडे सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचं स्वागत करीत असताना नंदुरबार पोलिसांनी फुटपाथ, उघड्यावर राहणाऱ्या निराधारांना माणुसकीची ऊब देत चादरी व ब्लँकेट वाटप करून जिल्हाभर हा उपक्रम राबविला. नंदुरबार पोलिसांनी 30 व 31 डिसेंम्बर दिवसा व रात्री नाकाबंदी व गस्तीचा बंदोबस्त लावला होता त्या निमित्त पोलीस अधीक्षक पी.आर पाटील साहेब व अप्पर पोलीस अधीक्षक निलेश तांबे साहेब यांना रस्त्यालगत, बसस्टॅन्ड, रेल्वेस्टेशन, या ठिकाणी निराधार लोक थंडीत कुडकुडत आढळून आले असता त्यांनी तात्काळ आपले सहकारी यांच्याशी सल्ला सलामत करून सामाजिक संस्था यांच्या मदतीने चादरी,ब्लँकेट उपलब्ध केल्या व निराधारांच्या अंगावर पोलीस अधिकारी व अंमलदारांनी स्वतः आपल्या हातांनी पांघरल्या. या अशा अनोख्या पद्दतीचे नंदुरबार पोलिसांनी नवीन वर्षाचे स्वागत केल्याने नंदुरबार पोलिसांचे माणुसकी व जिव्हाळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे

# मोदी सरकारने गरिबांच्या तोंडचा घास हिरावला : लोंढे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरिबांच्या तोंडचा घास हिरावून घेतला आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत गरिबांना अतिरिक्त ५ किलो अन्नधान्य पुरवणारी प्रधानमंत्री गरीब अन्न कल्याण योजना मोदी सरकारने बंद केली आहे. गेल्या दोन वर्षांपासून ८१ कोटी गरिबांना महिन्याला १० किलो धान्य मिळत होते परंतु आता फक्त ५ किलोच मिळणार आहे. मोदी सरकारने नवीन वर्षाची 'अनोखी भेट' देऊन गरिबांची थट्टा केली आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटले आहे.

मोदी सरकारच्या निर्णयाचा समाचार घेत अतुल लोंढे म्हणाले की, देशातील ८१ कोटी गरिबांसाठीचा एवढा महत्वाचा निर्णय घेताना पंतप्रधानांनी राज्य सरकारे आणि संसदेतही कोणतीच चर्चा केली नाही. गरिबांना फायदा देणारा ऐतिहासिक निर्णय म्हणून मोदी सरकार मोफत ५ किलो धान्याचा खोटा प्रचार करत आहे. आता गरिबांना खुल्या बाजारातून गहू खरेदी करताना जास्तीचे पैसे मोजावे लागणार आहेत. वाढत्या महागाईत हा भूर्दंड गरिब जनतेला परवडणार नाही पण मोदी सरकारला गरिबांची चिंता नाही. फक्त मोफत धान्य देण्याच्या जाहिरातीवर करोडो रुपये खर्च करून गरिबांचा कळवळा असल्याचे चित्र उभे करायचे आहे.

कोविड महामारीच्या काळात गंभीर आर्थिक संकटामुळे मोदी सरकारला गरिबांना अतिरिक्त रेशन देणे भाग पडले. पण आजही परिस्थितीत बदल झालेला नाही. युपीए सरकारच्या काळात असलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमती आज गगणाला भिडलेल्या आहेत. किराणा माल खरेदी करणेही सामान्य जनतेला परवड नाही. महागाईच्या मानाने उत्पन्नही वाढलेले नाही, त्यामुळे सामान्य लोकांचे जगणे कठीण झाले आहे. कोणतीही व्यक्ती उपाशी राहू नये म्हणून मा. सोनियाजी गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारने सप्टेंबर २०१३ मध्ये अन्न अधिकार कायदा लागू केला. बिघडलेली अर्थव्यवस्था व स्वतःच्या गैरव्यवस्थापनामुळे निर्माण झालेल्या व्यापक संकटाच्या आजच्या परिस्थितीत मोदी सरकारने हे तत्त्व कायम ठेवले पाहिजे होते.

अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत रेशन देणे ही जनतेला भेट नसून त्यांचा हक्कच आहे. नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री असताना अन्न सुरक्षा कायदा, मनरेगासारख्या युपीए सरकारच्या जनकल्याणकारी योजानांना विरोध केला होता. पंतप्रधान झाल्यानंतरही संसदेत मोदी यांनी मनरेगा योजनेवर टीका केली होती पण त्याच योजनांनी संकटकाळात देशातील जनतेला आधार दिला, त्याच योजनांचा आधार मोदी सरकारला घ्यावा लागला आणि युपीए सरकारच्या ज्या योजनांना विरोध केला होता त्याच योजना राबवत नरेंद्र मोदी त्याचे श्रेय मात्र लाटत आहेत असा टोलाही लोंढे यांनी लगावला.

# पंकज बैसठाकूर यांना पीएचडी प्रदान



आधुनिक केसरी न्यूज

**पूर्णा :** येथील पंकज ओंकारसिंह बैसठाकूर यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. डॉ.उद्धव भोसले,प्रभारी कुलगुरू डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या हस्ते नुकतीच पीएचडी प्रदान करण्यात आली. पंकज बैसठाकूर हे सूक्ष्मजीवशास्त्र (मायक्रोबायोलॉजी) या विषयाचे संशोधक विद्यार्थी आहेत.त्यांनी डॉ.टी.ए.कदम यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्रोडक्शन अँड कॅरेक्टरायझेशन ऑफ सेकंडरी मेटाबोलइट्स फ्रॉम स्ट्रेप्टोमायसिस स्पेसिस असोसिएटेड विथ रूट्स ऑफ लेग्युमिनस प्लांट्स'या विषयात आपले संशोधन कार्य पूर्ण केले. त्यांच्या या संशोधन कार्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.उद्धव भोसले, प्रभारी कुलगुरू डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन, बाह्य परीक्षक डॉ. गुरुविंदरसिंह कोचर, डॉ. देवींदर कौर, शिवसेना (ठाकरे गट) जिल्हाप्रमुख विशाल कदम, संतोष एकलारे,एस. जे. पांचाळ, त्र्यंबक पांचाळ, अरुण डुब्बेवार, प्रा.एस.पी. चव्हाण, डॉ.एच. जे. भोसले, डॉ.एल.एच. कांबळे, अभिषेक बैसठाकूर,डॉ.आर.डी.बरडे, बाळासाहेब कुळकर्णी,बी.डी.लाड,एस.सी. चव्हाण, डी.जी. पुरी, एम.एस.जाधव, बिंदासिंह ठाकूर आदी जणांनी पंकज बैसठाकूर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# ज्ञानसागर वाचनालयात सावित्रीमाईंना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त ज्ञानसागर वाचनालय, एन-2 विठ्ठलचौक येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी कॉ. भास्कर लहाने, सामाजिक कार्यकर्ते सुभाष पाटील पांडभरे, राष्ट्रवादीचे नेते गंगाराम कापसे, सुभाष शुक्ला, अरुण वाघ, एकनाथ चातुर, अनिल मोरे, एल.डी. खालापुरे, जी.जे. पोपळघट, राधाकिसन सुरडकर, आदित्य लहाने, जीवन म्हस्के आदी हजर होते.



# 'दमरे'तर्फे दरवर्षी १००० कोटीच्या सुट्या भागांची खरेदी

## मराठवाड्यातील लघु उद्योजकांना संधीची माहिती देण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरतर्फे (मसिआ) आयोजित औद्योगिक प्रदर्शन 'ॲडव्हांटेज महाराष्ट्र एक्स्पो-२०२३'ची तयारी पूर्ण झाली असून लघु उद्योजकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून यंदा पहिल्यांदाच "रेल्वे विभागात लघु उद्योजकांना व्यवसाय वृद्धिसाठी संधी" या विषयावर एका खास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात दक्षिण मध्य रेल्वेचे अधिकारी मार्गदर्शन करतील. मसिआच्यावतीने दर तीन वर्षांनी 'ॲडव्हांटेज महाराष्ट्र एक्स्पो' हे औद्योगिक प्रदर्शन आयोजित केले जाते. यंदा ५ ते ८ जानेवारी २०२३ दरम्यान भारतातील पहिले स्मार्ट औद्योगिक शहर ऑरीक सिटी, शेंद्रा येथे आयोजन करण्यात आले आहे. औरंगाबादसह मराठवाड्यातील लघु उद्योजकांना नवनवीन संधी उपलब्ध करून देणे तसेच नवीन उत्पादने व तंत्रज्ञानाची माहिती मिळणे हे प्रदर्शनाचे उद्दिष्ट आहे. रेल्वे विभागात लघु उद्योजकांना उद्योजकतेच्या मोठ्या संधी आहेत. मात्र, त्याची फारसी माहिती उपलब्ध नसते. एकटा दक्षिण मध्य रेल्वे विभाग दरवर्षी सुमारे १००० कोटी रुपयांच्या सुट्या भागांची खरेदी करतो. त्यांची माहिती करून देण्यासाठी प्रदर्शनात "रेल्वे विभागात लघु उद्योजकांना व्यवसाय वृद्धीसाठी नविन संधी" या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. रेल्वे विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत काही सुटे भाग प्रदर्शनात ठेवले जातील. हे भाग मराठवाड्यातील उद्योजकांनी तयार करावे यासाठी रेल्वे विभागही आग्रही आहे. या संधीचा फायदा घेण्यासाठी अधिकाधिक लघु उद्योजकांनी कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन सिकंदराबाद रेल्वे विभागाचे अधिकारी नीतेश मुळे तसेच मसिआचे अध्यक्ष किरण जगताप, कनव्हेनर अभय हंचनाळ तसेच सचिव राहुल मोगले यांनी केले आहे. मसिआच्या औद्योगिक प्रदर्शनाला यशस्वी परंपरा लाभलेली आहे. आजवर वर्ष २००२, २००५, २०१०, २०११, २०१४, २०१७ आणि २०२० मध्ये प्रदर्शन आयोजित केले आहेत. त्यात देश-परदेशातील नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवला आहे. मोठ्या संख्येने गुंतवणूकदार, प्रदर्शक आणि सामान्य नागरीक भेटी देतात. 'ॲडव्हांटेज महाराष्ट्र एक्स्पो -२०२३' मराठवाड्यात गुंतवणूक खेचून आणण्यासाठी फायदेशीर ठरेल. तसेच मराठवाड्यातील औद्योगिक क्षमता जागतिक पातळीवर पोहचवेल, असा आयोजकांना विश्वास आहे. मागील प्रदर्शनातून कोट्यवधीची उलाढाल झाली असून दरवर्षी त्यात वाढच होत आहे.




# वैजापूरात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिम्मित वैजापूरात अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वैजापूर गंगापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार रमेश बोरनारे, गटनेते दशरथ बनकर, काशिनाथ शेठ गायकवाड, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिंदे, शहराध्यक्ष पुंडलिक गायकवाड, नगरसेवक शैलेश सुराशे,पारस घाटे, नगरसेविका प्रीती भोपळे,आरती शिंदे,मंजुषा ढाकरे, ग्रामीणचे सरपंच दौलत गायकवाड, जगनराव गायकवाड, आबा जेजुरकर, सजन गायकवाड, प्रकाश माळी, बाबा तात्या गायकवाड, परेश भोपळे, ज्ञानेश्वर घोडके, राजेश गायकवाड, अशोक देवकर, दिगंबर वाकचौरे, रतिलाल गायकवाड, गौतम गायकवाड,सलीम तांबोळी, सुयोग जेजुरकर, दिलीप अनर्थे, राधेश्याम जगताप, मोती वाघ, संतोष गायकवाड, अशोक बनकर, शिक्षक जगताप, ऋषी बनकर, गणेश त्रिभुवन,अशोक पवार खंडाळकर, संजय गायकवाड, सोपान देवकर, सुरेश भालेराव, जीबी पैठणकर, राजू राजपूत सह आदींची उपस्थिती होती तसेच याप्रसंगी आयोजकांनी सत्यशोधक समाज संघ दिनदर्शिकेचे उपस्थितांना वाटप केले. सूत्रसंचालन ठाकूर धोंडीराम सिंह राजपूत यांनी केले तर आभार जगनराव गायकवाड यांनी मानले.

# पिंपळगाव वळण येथे काशिनाथ जाधव यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पिंपळगाव वळण येथील नागरिकांनी आज दिनांक 1/1/2023 रोजी काशिनाथ जाधव यांची माननीय शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेच्या जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने परिसरातील व गावातील नागरिकांनी लोक सत्कार ठेवला होता. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष दादाराव नाना वहाटूळे होते. सुभाष पांचाळ यांनी प्रास्ताविक केले तसेच देवनाथ बापू सोनवणे किनगावकर यांनी शेतकरी संघटनेबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की शेतकऱ्यांसाठी जिल्ह्यात मोठे आंदोलन उभारण्याची आवश्यकता आहे करिता जमलेल्या लोकांना आवाहन करून मार्गदर्शन केले तसेच देवगिरी सहकार्य कारखान्याचे मा. संचालक श्याम बाबा गावंडे यांनी भारताने बाहेरून आयात केलेल्या कापसाबद्दल आंदोलन उभा करण्याचा



इशारा दिला कृषी उत्पन्न बाजार समितीचे फुलंब्री चे संचालक श्री सुभाष गायकवाड यांनी सर्व राजकीय मतभेद विसरून शेतकऱ्यांसाठी एकजुटीने जिल्हाध्यक्ष काशिनाथ दादा जाधव यांच्या पाठीशी उभा राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास उपस्थित श्री तेजराव चव्हाण किनगावकर यांनी आम्ही सर्व ताकदीनिशी आपल्या पाठीशी नेहमी उभे राहू असे आश्वासन दिले या प्रसंगी श्री राधाकिसन साबळे गेवराई श्री श्रीराम लगड खिर्डी श्री बबनराव जाधव सरपंच वारेगाव श्री सुखदेव जाधव चेअरमन वानेगाव श्री भानुदास जाधव ,कांता बापू अध्यक्ष तंटामुक्ती वाणेगाव श्री माधवराव आहेर खीर्डी श्री शिवनारायण गायकवाड सरपंच पिंपळगाव, अविन वाटुळे चेअरमन पिंपळगाव किशोर जाधव बिल्डा, जगन्नाथ वाटोळे, ज्ञानेश्वर गायकवाड, शिवाजी वाटोळे, सुभाष पांचाळ श्री तेजराव पल्हाळ श्री गणेश जाधव श्री संजय वाहटुळे, द्वारकादास वाहटुळे, अंबादास शिरसाट, अशोक वाहटुळे श्री रावसाहेब वाहटुळे, बाबासाहेब वाहटुळे, नारायण वाहटुळे, नवनाथ टेकाळे, रावसाहेब शिरसाट, भगवान शिरसाट, नामदेव वाहटुळे, जालन सिंग राजपूत आदींनी परिश्रम घेतले श्री जगन्नाथ वाहटुळे यांनी आभार प्रदर्शन केले.

# सावित्रीला लेकींचा सलाम

आधुनिक केसरी न्यूज

**वाडा/पालघर :** अस्पी विद्यालय व ना. आ. शिंदे कला विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय उचाट, पालघर येथे अनोख्या पद्धतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी विद्यार्थिनींनी १० बाय १२ फुटांची भव्य रांगोळी काढून व पुस्तकांनी सजावट करून सावित्रीबाईंना अभिवादन केले.







# छत्रपती शाहू विद्यालयात स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयात नुकताच वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच सुप्त कलागुणांना वाव मिळावा, विद्यार्थ्यात संघ भावना वाढीस लागून आयुष्य सुंदर जगता यावं व आयुष्यातील संघर्षमय वातावरणात घेतलेला आंनद अनुभव पूरक ठरून विद्यार्थी विकास व्हावा असा हेतू ठेवत विद्यार्थ्यांच्या नृत्य कलाकृतीसह हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अध्यक्ष स्थान उप मुख्याध्यापक एस एन सय्यद यांनी भूषवले तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवकशैलेश चव्हाण पंचायत समितीचे विषय तज्ञ रमेश बागुल, नगरपरिषद पर्यवेक्षक एम आर गणवीर, राजे संभाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील व्यवहारे, मुख्याध्यापक निर्मळ,मुख्याध्यापक डी बि भुजाडे, प्राचार्य विष्णू भिंगारदेव, उपप्राचार्य सुनील कोतकर यांची उपस्थिती लाभली.या कार्यक्रमासाठी शाळेचे उपमुख्याध्यापक एस. एन. सय्यद शिक्षक एम. के. जाधव, शिक्षिका एस डब्लू देशमुख, वाय डी राजपूत, शिक्षक यू. एस. भारती, शिक्षिका स्नेहल गायकवाड, ए.ए. सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले असून यावेळी प्राध्यापक प्रवीण पाटील,एफ एम गायकवाड, गणेश ठोंबरे, प्रशांत गायकवाड, रावसाहेब जाधव, महेंद्र पठारे, संगीता काळे, निलेश अंभोरे, रुपाली खोमणे, रत्नेश शेवाळे, शारदा वडवळ आदी शिक्षक शिक्षिका, कर्मचारी विद्यार्थी पालक आदींची उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य समाजास दिशादर्शक

## प्राचार्य विजेंद्र चौधरी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** स्वा. सावरकर माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय बीडमध्ये क्रांती ज्योती सावित्री बाई फुले जयंती साजरी करण्यात आली. मध्ययुगात स्त्री शिक्षणाचा प्रारंभ क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यानी म फुलेच्या मदतीने समाज जागृत करणेसाठी शिक्षण हे स्त्रियांसाठी मिळण्यासाठी प्रयत्न केले भारतीय समाजात भारतीयांचा आत्मविश्वास जागृत करण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यानी केले. 21व्या शतकात आपल्याला मिळालेली सुवर्णसंधी शिक्षण घेण्याची आहे याचा भविष्यकाळात भारतवर्षासाठी आपले योगदान द्यावे. अध्यक्षीय समारोप प्राचार्य विजेंद्र चौधरी यानी मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले यांचे चरित्रातील विविध प्रसंगाचे वर्णन केले आजच्या काळात यांच्या चरित्रातील सर्वसमावेशकता हा गुण घेवुन भारत देशाच्या जडणघडणीत आपण सक्षम पणे योगदान द्यावे हा संकल्प आजच्या दिनी करु या यांचे कार्य भविष्यकाळात समाजास दिशादर्शक होय. यावेळी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रम अध्यक्ष प्राचार्य विजेंद्र चौधरी प्रमुख, प्रा. चंद्रकांत मुळे, वक्त्या प्रा. अंजली देशमुख, प्रा. बाळासाहेब साळवे, प्रा. निशा जेवुरकर, पर्यवेक्षक दत्तात्रय तांबारे होते. प्रास्ताविक अभ्यास पुरक प्रमुख प्रा. शशिकांत पसारकर सुत्रसंचलन प्रा. रत्नमाला सोनवणे व आभार प्रदर्शन प्रा. मनीषा कुलकर्णी यांनी केले. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा. वा.ना. आंधळे राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज

**एरंडोल :** वाङ्मयीन त्रैमासिक 'तिफण' तथा भाषा साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड, जि. औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त कन्नड तालुक्यातील औराळा या ग्रामीण परिसरात दि.२२ जानेवारी २०२३ रोजी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी खान्देशातील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना. आंधळे यांची निवड करण्यात आलेली आहे.उदघाटन रानकवी तुकाराम धांडे यांच्या शुभहस्ते होत असून मराठवाड्यातील साहित्यिक व भाषा अभ्यासक यांची उपस्थिती लाभणार आहे.

ग्रामीण भागात लेखन वाचन संस्कृती रुजावी व सांस्कृतिक चळवळ गतिमान होऊन उत्तोमोत्तम साहित्यिक घडावेत या उद्देशाने गेल्या चार वर्षांपासून या महोत्सवाचे राज्यस्तरावर आयोजन केले जाते. हे महोत्सवाचे पाचवे वर्ष असून यापूर्वी जेष्ठ साहित्यिक प्रभाकर शेळके(जालना), डॉ.दासू वैद्य(औरंगाबाद), डॉ.प्रतिभा अहिरे(कन्नड), संदीप जगताप(नाशिक) यांनी या महोत्सवाचे अध्यक्षपद भूषविले आहे.



प्रा. आंधळे यांची काव्यलेखन साधना ही चार दशकांपेक्षा अधिक असून नुकतेच दि.२५ डिसेंबर २०२२ रोजी नाशिक येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. वृत्तपत्रापासून चित्रपट क्षेत्रापर्यंत काव्यलेखन करणाऱ्या प्रा.आंधळे यांच्या कविता शालेय अभ्यासक्रमापासून महाविद्यालयीन अभ्यासक्रमात अभ्यासल्या जात आहेत. यापूर्वीही पाच राज्यस्तरीय साहित्य संमेलनातून कवी संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा मान त्यांना मिळाला आहे. स्त्रीभ्रूण हत्येविरोधात त्यांनी लिहिलेल्या 'आई! मला जन्म घेऊ दे' या कवितेने विश्वव्यापी प्रबोधन केले असून हिंदी व इंग्रजीसह ४५ भारतीय भाषेत या कवितेचे अनुवाद झालेले आहेत. काव्यलेखनासोबतच ललित व समीक्षा लेखन या साहित्य प्रांतात त्यांची लेखणी कार्यरत आहे. प्रा.आंधळे यांचा राज्यस्तरावर होणारा हा सन्मान म्हणून त्यांच्या कवितेच्या चाहत्यांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# महावितरणच्या संपाला बिलोलीत शंभर टक्के प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**ज्ञानेश्वर शिरगिरे**

**बिलोली :** विद्युत महावितरणच्या तिन्ही विभागांचे खाजगीकरण करण्यात येऊ नये म्हणून आजपासुन विद्युत महावितरणच्या विज वितरणअधिकारी व कर्मचारी, अभियंता संघर्ष समितीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या बाहत्तर तासांच्या संपाला बिलोली येथील विद्युत महावितरणच्या सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता विद्युत महावितरणच्या कार्यालयातील कार्यरत सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता, लाईनमन, हेल्पर, सहाय्यक लेखाधिकारी,लेखा सहाय्यक यांसह संपूर्ण अधिकार, कर्मचारी, अभियंता वर्ग सहभागी होऊन शंभर टक्के प्रतिसाद दिला आहे. सदरील संप ग्राहकांच्या विरोधात नसुन खाजगीकरणाच्या विरोधात आहे.असे बिलोली येथील सहाय्यक अभियंता वाघमारे आणि कनिष्ठ अभियंता अनिल टिकार यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस सांगितले आहे. सदरिल संपात विद्युत महावितरणचे स्थानीक कार्यालयातील लेखाअधिकारी अमोल लक्ष्मणराव मोळके साहेब,तंत्रज्ञ संदिप फुलारी, संतोष इंगळे, बालाजी मरकंटे, गणेश काळे, साहेबराव जेठे, उत्तमराव सोंडारे, शिवाजीराव आलेबले, वानखेडे, बालाजी अकुलवार,सौ.वर्षा पांढरे यांसह बहुसंख्य अधिकारी व कर्मचारी मंडळी सहभागी होऊन महाराष्ट्र शासनाच्या



विद्युत महावितरणच्या विरोधात असलेल्या धोरण नितीचा तीव्र निषेध केला आहे. सदरील संपाची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन विद्युत महावितरणचे खाजगीकरण करु नये, महावितरणात वर्ष २०१९ चे उपकेंद्रे कंपनी मार्फत चालवावे, उपकेंद्र मधील कायम कर्मचारी यांची पदस्थापना करण्यात यावे, इम्पनलमेंट पद्धतीने कंत्राटीकरण बंद करणे, तिन्ही कंपनीतील रिक्त पदे भरणे, आऊटसोर्सिंग,कंत्राटी, सुरक्षा रक्षक यांना सेवेत कायम करणे आदी विविध मागण्या पुर्ण करण्यासाठी सदरिल संप आहे.नागरीकांच्या विरोधात नसुन खाजगीकरणाच्या विरोधात आहे.असे बिलोली येथील विद्युत महावितरणचे कनिष्ठ अभियंता अनिल टिकार यांनी प्रस्तुत प्रतिनिधीस सांगितले आहे. जनतेच्या गैरसोईबद्धल दिलगीरी व्यक्त करण्यात येत आहे. सदरील संपाला मात्र बिलोली उपविभागात शंभर टक्के प्रतिसाद मिळाला आहे.

# 24 तासांत धुळे पोलिसांनी केला खुनाचा उलगडा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात काही दिवसापूर्वी पेट्रोल पंप च्या मागील बाजूस उत्तर प्रदेश येथील हमाल कामगाराचा खून झाला असता या संदर्भात संशयित आरोपीला 24 तासाच्या आत एलसीबीने ताब्यात घेतले. आरोपी व मयत व्यक्ति अंमळनेर येथे वेश्या बाजारात गेले असता संध्याकाळी आंमळनेर येथून धुळे येथे आल्यावर पाण्याच्या टाकीजवळ बोलवून पैश्याच्या वादात असल्याने अनैतिक संभोग करून त्याचे पैशे काढून व त्याचा खून केला या घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगात फिरवली. यात एलसीबीला यश आले असून खूनातील संशयीतास पनवेलहून ताब्यात घेतले आहे . उत्तरप्रदेशचा रहिवासी विजयकुमार हा काही दिवसांपासून धुळ्यात हमाली करत होता . काल सकाळी त्याचा अर्धनग्नावस्थेत मृतदेह मिळून आला . घटनेनंतर पोलिसांनी चौकशीस वेग दिला . ज्या अवस्थेत विजयकुमारचा मृतदेह मिळाला . त्यावरुन त्याच्या परिचयाच्या व्यक्तिनेच त्याचा घात केल्याचे उघड दिसत होते . त्यानुसार पोलिसांनी महत्त्वपूर्ण धागे जुळविले . संशयीताचा शोध घेताना धुळे एलसीबीने थेट कळंबोली ( पनवेल) गाठले . तेथून रात्री संशयीताच्या मुसक्या आवळल्या . त्याला सकाळीच धुळ्यात आणण्यात आले आहे त्याची कसून चौकशी सुरु आहे . सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार संशयीताचे नाव राहूल गौतम असून तो देखील उत्तरप्रदेशातील रहिवासी आहे. तो व विजयकुमार हे सोबतच हमाली काम करायचे.

परवा सकाळी दोघे सोबतच दारु पित होते . रात्री देखील दारुची क्वार्टर घेण्याच्या पैशांवरुन दोघांमध्ये वाद झाला . वादाचे पर्यवसन मारामारीत झाले . यावेळी मयत विजयकुमार हा दारुच्या नशेतच होता . राहुल गौतम याने जवळच असलेल्या झाडाची फांदी तोडून त्याद्वारे विजयकुमारला मारण्यास सुरवात केली . तसेच त्याच्या निकरच्या खिशातील पैसे काढण्यासाठी त्याची पॅण्ट काढली. त्यानंतर पैसे व मोबाईल काढून पळ काढला . दरम्यान , डोक्यावर गंभीर जखम झाल्याने विजयकुमारचा मृत्यू झाला होता. घटनेनंतर संशयीत राहूल गौतम हा कळंबोली ( पनवेल ) येथे त्याच्या मित्राकडे गेला . तेथे नवीन कामधंदा करण्याचा त्याचा इरादा होता . परंतु , एलसीबीने काल रात्रीच त्याच्या मुसक्या आवळल्या. त्यामुळे हा खूनाचा गुन्हा अवघ्या २४ तासात उघडकीस आणण्यात एलसीबीला यश आले आहे . सदर कामगिरी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अ . अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पीआय हेमंत पाटील, पीएसआय योगेश राऊत, पोहवा प्रभाकर बैसाणे, श्रीकांत पाटील, पोकॉ कमलेश सूर्यवंशी, योगेश चव्हाण, राहूल सानप, राहूल गिरी, तुषार पारधी, रफिक पठाण, मयुर पाटील यांच्या पथकाने केली.

# धानोरा(बु. ) येथे सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** धानोरा (बु.) येथे स्त्री जीवनाचा हुंकार आणि स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त एकल महिला संघटनेच्या वतीने सावित्रीबाईना अभिवादन करण्यात आले. सावित्रीमाईंच्या जयंती दिनापासून सावित्रीबाई ते जिजाऊ उत्सव असे कार्यक्रम संपन्न होणार आहेत. आज पहिल्या दिवशी धानोरा (बु.) गावापासून या कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमास 05 गावातील महिला उपस्थित होत्या. धानोरा बु तांडा, तडोळा, केंद्रेवाडी, बाभळगाव, येथील महिलांनी निश्चय केला की आज पासून संपूर्ण महामानवांच्या जयंत्या साजऱ्या करण्याचा निर्णय झाला. ही सुरुवात चित्रा पाटील एकल महिला संघटनेने केली. लीडर्स चित्रा पाटील, पूनम



बनसोडे, शिंधु सोमवंशी, आशा झिंझुर्डे, माधुरी भालेराव, सीता सरवदे, सुरेखा गिरी, चंपा कदम, मंदाकिनी कातले, गयाबाई गिरी, रेवती गायकवाड, सुनीता आडे, गिरजा आडे, प्रणिता पाटील, वंदना पांडे, प्रतिभा सोमवंशी, शारदा जाधव, सुरेखा पाटील, रुकसानबी शेख, सुनिता दहिभाते, आशा तणमोर, आशा सोमवंशी, आशा गिरी आदी महिला उपस्थित होत्या.

# डोंगरगाव येथील युवतीचा शेततळ्यात पडून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** निफाड तालुक्यातील डोंगरगाव येथील कु.



ऋतिका गोकूळ फड - वय १६ हिचा शेततळ्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाला. काल सकाळी सहा वाजेच्या दरम्यान ऋतिका शतपावली व्यायाम करण्यासाठी शेततळ्याकडे गेली होती. मात्र बराच वेळ ती घरी न आल्याने तिची शोधाशोध करूनही ती सापडली नाही. त्यामुळे चांदोरी येथील सागर गडाख,वैभव जमदाडे, विलास सूर्यवंशी, सुरेश शेटे, कृष्णा धोंडगे या स्थानिक आपत्ती व्यवस्थापन समितीला पाचारण करण्यात आले. या चमूने शेततळ्यात शोध घेतला असता सकाळी ११ वाजेच्या सुमारास शेततळ्यात ऋतिकाचा मृतदेह आढळून आला. याबाबत पो.पा. संजय वाघ यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात कळविताच स.पो.नि.राहुल वाघ यांनी पोलिस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेतली. घटनेचा पंचनामा करुन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. सदर घटनेची लासलगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# नायलॉन मांजाची विक्री व वापरास प्रतिबंध

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** मकर संक्रांती सणाच्या वेळी प्लास्टिक किंवा कृत्रिम वस्तूचा वापर करून बनविण्यात आलेल्या नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक व हाताळणी करण्यास पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 अन्वये प्रतिबंध केला असल्याचे जिल्हादंडाधिकारी मनीषा खत्री यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

नायलॉन मांजामुळे पक्षी व मानव जिवितांस इजा होते. काही प्रसंगी त्या इजा प्राणघातक ठरतात. मकरसंक्राती सणाच्या वेळी मोठ्या प्रमाणावर पतंग उडविण्याचा खेळ खेळला जातो. पतंगासह तुटलेले नायलॉन मांजाच्या धाग्यांचे तुकडे जमिनीवर पडतात नायलॉन मांजाचे तुकडे हे लवकर विघटन होण्याजोगे नसल्याने गटारे व नदी-नाल्यासारख्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण करतात. तसेच नायलॉन मांजाचे तुकड्यामुळे गाय अथवा तत्सम प्राण्यांनी नायलॉन मांजाचे तुकडे समाविष्ट असलेले खाद्य सेवन केल्यामुळे त्यांना गुदमरण्याचा त्रास होतो. अशा धाग्यांमधील प्लास्टिकच्या वस्तुंमुळे विविध प्रकारचे दुष्परिणाम होतात. माती व पाण्याच्या गुणवत्तेची पातळी घसरते.

प्लॅस्टिक किंवा इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेल्या



नायलॉन मांजा या नावाने परिचित असलेल्या पक्क्या धाग्याचा वापर पतंग उडविण्याचा सणाच्या वेळी करण्यात येतो. त्यामुळे पक्षांना व मानवी जिवितांस तीव्र इजा होण्याचा नायलॉन मांजाचे दुष्परिणाम लक्षात घेऊन अशा धाग्यांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, तसेच साठवणुकदार यांनी तत्परतेने नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक थांबवावी. वर्षभरात त्यांची साठवणूक, हाताळणी व विक्री होणार नाही.

पतंग उडविताना केलेल्या माजांच्या वापरामुळे विजेच्या तारांवर घर्षण होऊन आग लागणे, उपकेंद्र बंद पडणे, वीज उपकरणे बिघडणे, अपघात घडणे, इजा व जीवीत हानी होणे अशा घटना घडण्याची शक्यता असल्याने, याबाबतची आवश्यक ती खबरदारी घ्यावी. नायलॉन मांजाच्या धाग्याच्या दुष्परिणामांबाबत शाळा,महाविद्यालय तसेच लोकांमध्ये जनजागृती करावी. तसेच सर्व नागरिकांनी निर्देशाचे पालन करावे, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.




# गुगल डेव्हफेस्ट 2022 चे छत्रपती शाहू महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचालित छत्रपती शाहू महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय आणि गुगल डेव्हलपर्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय 'गुगल डेव्हफेस्ट 2022' (GOOGLE DEVFEST 2022) ही एकदिवसीय कार्यशाळा संस्थेच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमार्फत गुगल डेव्हलपर्स ग्रुप (GDG) ने औरंगाबाद मधील स्थानिक विकासक आणि विद्यार्थ्यांना उदयोन्मुख साधने आणि तंत्रज्ञानावर चर्चा करण्याची संधी दिली. या कार्यशाळेसाठी 500 हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तसेच 10 पेक्षा जास्त अधिक वक्त्यांनी उपस्थितांना विविध नवीन तंत्रज्ञाना संदर्भात संबोधित केले. या परिषदेचे उद्घाटन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. गुगल डेव्हफेस्ट 2022 ही परिषद प्रथमच औरंगाबाद शहरात आयोजित करण्यात आली होती. असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांनी सागितले. गुगल डेव्हलपर ग्रुपचे श्री. आशुतोष भाकरे यांनी IAAS प्लॅटफॉर्म आणि गुगल क्लाऊड सर्विसेसबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. सॉफ्टवेअर अभियंते श्री. पवन वानखेडे यांनी लिनक्स या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देत क्लाऊड सर्विसेससाठी लिनक्स कसे महत्वाचे आहे, हे सांगितले. सॉफ्टवेअर अभियंते श्री. आकाश बडक आणि श्री. प्रज्वल म्हस्के यांनी CI / CD या सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मॉडेलविषयी थेट प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांसमोर सादर केले. श्री. प्रफुल चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना प्लेयिंग विथ गूगल कन्सोल याद्वारे गूगल कन्सोलचा सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटसाठी कसा वापर करायचा याबाबतचे प्रात्यक्षिक सादर केले. वेब होस्टिंग, क्लाऊड रन / बिल्ड ,क्लाउड डेटाबेस आणि त्याचा वापर, गूगल कुबेरनेट्स इंजिन, ओपन सोर्समधील करिअरच्या संधी, आर्ट ऑफ नॉन -कोड काँट्रीब्युशन इत्यादी विषयावर स्वाफ्टवेअर अभियंते शिवानी बिरादर, गार्गी मेहेंदळे, श्री. सत्यम बुऱ्हाडे , श्री. पार्थ गोस्वामी, श्री. महेश न्यायाधीश यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिषदेचे समन्वयक डॉ. संदीप अभंग यांनी अधिक परिश्रम घेतले तसेच संस्थेच्या वतीने गुगल डेव्हलपर्स ग्रुपचे आभार मानले. प्रा. सुजित रगटे, डॉ. विलास गायकवाड, डॉ. कैलास खरात, प्रा. आशिष कदम, प्रा. आतिष काटकर, प्रा. मीनाक्षी पाचपाटील यांनी परिश्रम घेतले.

# मातोश्री वृद्धाश्रम येथे पकडले दोन घोणस जातीचे साप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** हिवाळ्यात घोणस जातीच्या अतिविषारी सापांचा मिलनचा सिझन असतो. त्यामुळे ते अनेकदा आपल्या दृष्टीस पडत आहेत. मातोश्री वृद्धाश्रम येथे असेच दोन घोणस जातीचे नरमादी साप आश्रम परिसरात असल्याचे कळल्यानंतर सर्पमित्र निर्भय साकला अतिशय धाडसाने या विषारी सापांना पकडून जीवदान दिले. मात्र, अजगरासारखा भासणारा घोणस जातीचा अतिविषारी साप आपणाकडे निदर्शनास पडतो. सध्या हिवाळ्याचे दिवस असल्याने या विषारी घोणस सापांच्या मिलनाचा वेळ असतो या सापाला जाडसर तपकिरी ठिपके असता. लोकांना घोणस सापांची माहिती नसल्याने त्यांना अजगर असल्याचा भासतो. या सापाचे खाद्य उंदिर, घूस आहे. हा घोणस साप अतिविषारी असल्याने लोकांना यापासून दूर राहणे गरजेचे आहे. निर्भय साकला आहे ट्रॅक्टर ट्रॉलीचे मोठे उद्योजक असून हे वन्यजीव संरक्षण व मानव जात संरक्षण यासाठी सहकार्य करत असतात या दोघी विषारी सापांना वन्यजीव परिसरात त्यांच्या हद्दीत सोडण्यात आले त्या ठिकाणी



सर्पतज्ञ नरेश सोनार व सर्पमित्र सनी सोनवणे यांचे सहकार्य लाभले. यांच्या ह्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दामिनी पथकाने वाचविला अल्पवयीन मुलीचा जीव



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मैत्रिणीने बदनामी केल्यामुळे संगीता (नाव बदलले) रा. मुकुंदवाडी हीने हरसूल तलावावर आत्महत्येचा प्रयत्न करीत असताना दामिनी पथकाने तिचा जीव वाचविला. हर्सूल तलावाचे सुरक्षा रक्षक यांनी संगीता तलावाच्या कठड्यावर रडत बसल्याचे फोन करून दामिनी पथकाला सांगितले. एपीआय सुषामा पवार, महिला पोलीस कर्मचारी लता जाधव, सुजाता खरात आणि मनीषा बनसोडे यांनी ताबडतोब घटनास्थळी जाऊन मुलीची समजूत काढली. तिची बहिण व इतर नातेवाईकांना तिचे समुपदेशन करीत नातेवाईकांच्या हवाली केले.

# मीनाक्षी पाटील यांना 'रूपाली दूधगावकर राष्ट्रीय पुरस्कार'

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिवार चॅरिटेबल ट्रस्ट, माथला, ता. जिंतूर, जि. परभणी यांच्यावतीने देण्यात येणारा 'रूपाली दूधगावकर राष्ट्रीय पुरस्कार- २०२२ ' सुप्रसिद्ध कवयित्री, चित्रकार, ललित लेखिका आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मीनाक्षी पाटील ( मुंबई ) यांना पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आला.



डॉ. मीनाक्षी पाटील यांचे पोएट्रीवाला पेपरवॉल मीडिया अँड पब्लिशिंग, अंधेरी ( पूर्व ) मुंबई तर्फे 'इज इट इन युवर डीएनए' (२००९) आणि 'ललद्यदस् ललबाय' (२०२२) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. यातून त्यांची कविता प्रदीर्घ, दीर्घ आणि मालिका रूपात भेटते. खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरणाच्या सांप्रतकाळी मानवी मन-सत्त्व-अस्तित्वाची होणारी तडफड आणि होरपळ हा त्यांच्या कवितेचा आशय आहे. ही कविता संवादी, प्रश्नात्मक, आध्यात्मिक आणि प्रायोगिक रूप घेताना दिसून येते. पाटील यांनी '१९८० नंतरच्या निवडक कवींच्या कवितांचा उत्तर-आधुनिकतावादाच्या दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच.डी.चे संशोधन केले आहे. तसेच त्यांचे ललित, चित्रकला, चित्रपट लेखन-दिग्दर्शन व कलाक्षेत्रातील एकूण कार्य लक्षात घेऊन, त्यांना रूपाली गणेशराव दूधगावकर स्मृती- प्रीत्यर्थ 'रूपाली दूधगावकर राष्ट्रीय पुरस्कार-२०२२' जाहीर केला आहे. पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र-चित्र आणि रू. २१ हजार रोख असे आहे. मान्यवर तीन सदस्यीय निवड समितीच्या वतीने वरील नावाची एकमताने शिफारस करण्यात आली होती. यापूर्वी हा पुरस्कार अनुराधा पाटील, रंगनाथ पठारे, भुजंग मेश्राम, श्याम मनोहर, अरूण काळे, प्राचार्य भगवान देशमुख, जयराम खेडेकर, भ. मा. परसवाळे, संजीवनी तडेगावकर, किशोर सानप, श्रीधर अंभोरे, सुचिता खल्लाळ, श्रीकांत देशमुख, विद्याधर म्हैसकर, इंद्रजित घुले, पृथ्वीराज तौर, प्रज्ञा दया पवार, मंगेश नारायणराव काळे आणि कविता मुरुमकर इ. साहित्यिकांना प्रदान करण्यात आला आहे.

या पुरस्काराचे वितरण गुरूवार दि.१२ जानेवारीला सायं ०५ वाजता , मिनी थिएटर, तिसरा मजला , पु.ल.देशपांडे कला अकादमी , रवींद्र नाट्यमंदिर , प्रभादेवी, मुंबई-२५ येथे ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम मा. मंत्री-खासदार ॲड. गणेशरावजी दूधगावकर, डॉ. सौ. संध्याताई दूधगावकर आणि इंजि. समीर दूधगावकर, पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ व साम टीव्हीचे संपादक संदीप काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. अशी माहिती शिवार ट्रस्टचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. श्रीधर भोंबे यांनी यावेळी दिली. या पत्रकार परिषदेला सदस्य कवी डॉ.विलास पाटील, कैलास अंभुरे, प्रा. श्रीधर कोल्हे, प्रा. अभिजीत वाघमारे, संजय शिंदे, कुलदीप चव्हाण, पांडुरंग दाभाडे यांची उपस्थिती होती.

